# प्रकरण तिसरे

## ''धगाडा'' आणि ''चिखलचोथा'' या कथासंग्रहातील कथांचा आशय विषयाच्या अंगाने अभ्यास

# प्रकरण तिसरे

# "धगाडा" आणि "चिखलचोथा" या कथासंग्रहातील कथांचा आशय विषयाच्या अंगाने अभ्यास

## 'धगाडा'

प्रा. केशव मेश्राम यांचा 'धगाडा' हा कथासंग्रह १९८४ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा 'दिवाकर कृष्ण' व कराड प्रतिष्ठानचा 'यशवंतराव चव्हाण' पुरस्कार मिळाला आहे.

"'धगाडा' म्हणजे शेकोटी, आगदी पहाटे पेटणाऱ्या या शेकोट्यातून जाणवलेली धग आजही मनातल्या सोशिकतेच्या ठिणग्या पेटवत ठेवते. "धगाडा" हा आमच्या विदर्भातला, शेकोटीचा प्रकार, तिथे थंडी खूप, सकाळी, संध्याकाळी शेकोटी पेटवावी लागते. ज्या कुणाला शेकोटीच्या ऊबेला बसायचं असेल त्यांनी आपला 'सासुसासरा' घेऊन जायच असतं. म्हणजे प्रत्येकाने ती शेकोटी पेटती रहावी म्हणून गवत, तुरकाट्या, फराट्या घेऊनच शेकोटीजवळ यायचं असतं. ही शेकोटीची धग आणि त्यांच्या पोटातील भुकेची, मनातील दु:खाची धग. असा हा 'धगाडा' आहे. समाजाने, संस्कृतीने ज्या माणसांच्या जगण्याची आचच शोषून घेतली आहे ती माणसं बाहेरच्या धगीपासून स्वत:च रक्षण करीत आपल्या आतल्या जगण्याची आच, इच्छा जपत चिवटपणे जगतात हे मी कथेत मांडतो. मला पुन: पुन्हा जाणवतं ते हे की माणसं वाईट नाहीत. परिस्थितीने त्यांना तसं बनवलं आहे."[१] गावाकडील सामाजिक, आर्थिक घडामोडीत करपलेल्या धगीचा चटका बसलेल्या असंख्य जीवनांची ही कहाणी. मुंबईतील लोकांच्या जगण्याची धडपड व भावनांची घुसमट यांची वाढणारी धग म्हणजे हा 'धगाडा' कथासंग्रह होय.

'धगाडा' या कथासंग्रहामध्ये एकूण चौदा कथांचा समावेश केलेला आहे. यातील काही कथा या मुंबईतील तर काही ग्रामीण सामाजिक जीवनाशी संबंधित आहेत. यातील सर्व कथा ह्या वेगवेगळ्या आशयाच्या आहेत.

**कडेलोट :**

'कडेलोट' ही कथा एका राजबली नावाच्या वॉचमनची आहे. राजबली रेल्वेच्या भंगारभांडारावर वॉचमन म्हणून काम करतो. राजबली ह्या भांडाराचा उपयोग वाईट कृत्यांसाठी करतो. पण एके दिवशी हेच वाईट कृत्य त्याच्या वाट्याला कसे येते आणि त्यामुळे त्याच्या वाट्याला दु:ख कशाप्रकारे येते त्याचे चित्रण प्रस्तुत कथेत करण्यात आले आहे.

'कडेलोट' कथेचा नायक राजबली हा नेपाळी गुरखा आहे. "चांगली रूंद छाती, मजबूत हाडपेर, जोरदार गालमिशा आणि गुबगुबीत हसरा चेहरा, पाहणाराला दबवून टाकी; पण राजबली वागायला आदबशीर होता. मनाने हळवा होता."[२] नेपाळमधील नाथजी नावाच्या खेडेगावात त्याचे कुटुंब राहते. घरात त्याची बायको, आई-वडिल आणि लज्जो नावाची एकुलती एक मुलगी राहते. राजबलीच्या काका-मावशांनी त्याचे शेत हडपल्यामुळे तो मुंबईत येतो. मुंबईत रेल्वेच्या भंगारभांडारात नाईट वॉचमन म्हणून कामाला लागतो. वेळच्या वेळी आपल्या गावाकडे जाणाऱ्या गुरखा मित्रांकडून घरच्यांना पैसे पाठवतो.

राजबली ज्या भांडारात काम करतो त्या भांडारचा ड्रायव्हर भांडारातील भंगार चोरून भंगार बाजारात विकत असतो. सिकंदर राजबलीला भंगार भांडारातील भंगार विकण्यासाठी अनेकवेळा दमदाटी करतो. आपल्या मित्रांना आणून राजबलीला धमकावतो. पण राजबली त्याच्या धमक्यांना भीक घालत नाही. कारण त्याला मिळालेली सरकारी नोकरी घालवायची नसते. तसेच दारूवाला कल्लू नावाचा गुंडही राजबलीला भंगारासाठी चाकूचा धाक दाखवत असतो. राजबली त्यावर उपाय म्हणून आपल्या हत्यारबंद वीस-पंचवीस गाववाल्या गुराख्यांना घरी बोलावून नाथजीची यात्रा करतो. हा प्रकार पाहून दारूवाला कल्लू राजबलीचा नाद सोडतो.

राजबली वॉचमनचे काम करत असताना त्याला एक वाईट सवय जडते. तो भंगारभांडारातील रिकामे डबे वेश्या व्यवसायासाठी भाड्याने देऊ लागतो. जसा पैसा

मिळेल तसा त्याचा हा व्यवसाय वाढतच जातो. रेल्वे भांडारात कंचन, दीपा ह्या वेश्या, सज्जन छक्का नियमितपणे गिऱ्हाईक घेऊन येतात. त्यांच्याकडून राजबली कमी पैसे घेतो. राजबली फक्त जोडीसाठीच भांडार वापरायला देतो. राजबली बड्या गिऱ्हाइकांकडून शंभर रूपयापासून ते दोन-तिनशे रूपये घेतो. गिऱ्हाईक हे पैसे देताना बंद पाकिटातून देतात. राजबली ह्या पैशातून गावाकडे पन्नास हजाराचे घर बांधतो. घरच्यांना कोणत्याही प्रकारे काही कमी पडू देत नाही. सर्वकाही सुरळीत चालू असते.

राजबली दररोज अनेक जोड्या पाहत असतो. अनेक नवनव्या मुली पाहत असतो. काही त्याच्या मुलीच्याही वयाच्या असतात. पण दररोजच्या सवयीने त्याला ह्या गोष्टींचे काहीच वाटत नसते. काही बेशुद्ध अवस्थेत असणाऱ्या मुलींना राजबली स्वत: टॅक्सीने दूर कोठेतरी सोडून येत असतो. एका रात्री हरचंद नावाचा मुलगा रेल्वेच्या डब्यात कोणीतरी मुलगी बेशुद्धावस्थेत पडल्याची बातमी सांगत येतो. राजबली जाऊन त्या बुरख्यात असलेल्या मुलीला उचलून आपल्या खोलीत घेऊन येतो. नेहमीप्रमाणे मुलीला कोठेतरी सोडण्यासाठी हरचंद टॅक्सी आणण्यासाठी धावतो. पण राजबली त्याला थांबवतो. आणि ओरडतो, "वरीदा, मुझे माफ करना! हराम का पैसा मेरी लज्जो को लूट गया. वरीदा। मै मक्कार हूँ, जानवर हूँ!"[३] राजबली स्वत:च्या बायकोचे नाव घेऊन आपल्या मुलीकडे पाहत पश्चाताप करतो. बुरख्यात स्वत:च्या मुलीला पाहून तो हादरून जातो. कारण त्याने इतकी दिवस केलेले वाईट कृत्य त्यालाच भोगायला आलेले असते.

'कडेलोट' ह्या कथेतून केशव मेश्राम ह्यांनी वाईट कृत्य करणाऱ्यांच्या जीवनातदेखील कशाप्रकारे वाईट प्रसंग येतात ह्यावर प्रकाश टाकला आहे. तसेच नकळत वाईट कृत्यापासून दूर राहण्याचा संदेश दिलेला आहे.

### अंधारखाई

'अंधारखाई' ही कथा शीर्षकाप्रमाणेच अंधारखाई आहे. या कथेतील कालिदास हा तरूण चोऱ्या करत करत अंधारखाईत केव्हा जातो त्याला समजत नाही. चोऱ्या करून त्याला मार खाण्याशिवाय काहीच मिळत नाही.

कालिदास हा अवघ्या सोळा वर्षाचा मुलगा आहे. गोरधन नावाचा चोरांचा म्होरक्या त्याला सूरत रेल्वे स्टेशनवरून पळवून आणतो. जबरदस्तीने कालिदासला चोरीचे प्रशिक्षण देतो. काही दिवसातच कालिदास चोरीचा धंदा करू लागतो. अल्पावधीतच तो चोरीचे सर्व डावपेच आत्मसात करतो. "बांद्रा स्टेशन ही कालिदासची अॅक्शन एरिया होती. जुन्या कत्तलखान्याच्या आणि पडलेल्या झोपड्यांच्या खंडहरातून वेगाने बेपत्ता होण्याचा त्याचा साडेतीन वर्षांचा सराव होता. म्हणून तर सोळा वर्षांचा होण्याच्या आधी त्याला गँगची दोन नंबरची कामगिरी सोपविली होती."[४] दोन नंबरची कामगिरी म्हणजे पाकिट मारण्याची कामगिरी.

कालिदास पाकिट मारण्यात पटाईत होता. पाकिट मारून तो धावत्या रेल्वेसमोरून क्षणात रेल्वेरूळ ओलांडून जातो. त्याच्या या चपळाईमुळे तो कधीही कोणाला सापडला नव्हता. कालिदास पाकिट मारून धावत धावत त्यातील पैसे काढून पाकिट टाकून देतो. पाकिट टाकताना तो त्यामध्ये स्वत:जवळील कोऱ्या कागदांचा बंडल आणि एखादी नोट पाकिटात ठेवतो. कालिदासच्या ह्या सवयीमुळे त्याच्या मागे लागणारी लोकं भरलेलं पाकिट आणि नोट पाहून थांबतात. ही संधी साधून तो गायब होतो. कालिदासला गोरधन दादाला खूश करून त्याच्या लाँचच्या कामावर जायचे असते. म्हणून कालिदास रोज सगळ्यात जास्त पैसे दादाला आणून देत असतो.

गोरधनदादाला जास्त पैसे देण्यासाठी कालिदास एक नंबरची कामगिरी करायला शिकतो. तो महिलांचे सोने लांबवण्याचे काम करू लागतो. गोरधनदादा त्याच्यावर खूश होतो. पण ही खुशी जास्त दिवस राहत नाही. कालिदास एकदा एका स्त्रीचे दागिने लांबवतो. पण लोकं त्याच्या पाठीमागे लागल्याने चिखलात ते दागिने टाकतो. दादाला ही गोष्ट समजते. काही वेळाने सगळे चोर ते दागिने शोधण्यासाठी त्या चिखलात जातात. पण दागिने सापडत नाहीत. दादाला कालिदासने दागिने आपल्यापासून लपवल्याचा संशय येतो आणि तो कालिदासला बेशुद्ध होईपर्यंत मारतो.

अंधारखाई ह्या कथेत मेश्रामांनी चोरीच्या व्यवसायाचे अगदी खोलवर चित्रण केले आहे. तसेच चोरीच्या व्यवसायातील प्रामाणिकपणावर प्रकाश टाकला आहे. चोरांचे चोरी करता करता मोठ्या चोऱ्यांकडे वळणे आणि त्यातून जनतेचा, म्होरक्याचा बेदम मार खाणे इत्यादी गोष्टी चित्रित केल्या आहेत. ह्या कथेतून त्यांनी चोरांची दुनिया किती जोखमीची आणि जीवावर बेतणारी असते हे स्पष्ट केले आहे.

**कलती दुपार**

केशव मेश्राम यांच्या अनेक कथा ह्या पोटाच्या भूकेसाठी काबाड कष्ट करणाऱ्यांच्या जीवनाचे दर्शन घडवतात. काहींना दोन वेळचे जेवणही मिळत नाही. चांगल्या जेवणाची स्वप्नं पाहणारी माणसं मेश्रामांच्या कथेत पहावयास मिळतात. "'कलती दुपार' मधला इब्लिस पैसे मिळाले की पाखरू खाण्याचं स्पप्न पाहतो."[५] इब्लिसला आपल्या मुलांवर अवलंबून राहावे लागते. त्याच्याकडे पैसे नसतात. मुले घरात नसताना इब्लिस कामाला जातो आणि तेथेच त्याचा अंत होतो. चांगल्या जेवणासाठी कामाला गेलेल्या इब्लिस मास्तराच्या जीवनाची शोकांतिका प्रस्तुत कथेत पहावयास मिळते.

कलती दुपार मधील इब्लिस मास्तर एका मिलमध्ये काम करतो. पण त्याची बायको त्याला मास्तर म्हणून हाक मारते. "तिनंच नाव ठेवला होता मास्तर मनून. नवरा मिलात जाते. पैसे कमावते. मास्तर हाएत असे सांगायची ती तिच्यासारख्या खेड्यातल्या अडाणी तिच्या सग्यासोयऱ्याला."[६] अचानक एके दिवशी त्याचा पाय मिलच्या मशीनमध्ये सापडतो. तो पूर्णपणे निकामी होतो. त्यामुळे इब्लिसची नोकरी जाते. इब्लिसचा पाय निकामी झाल्याने तो घरीच पडून राहतो. दोन मुले, दोन सुना त्यांची मुले असा मोठा परिवार त्याचा असतो. मुले त्याचा सांभाळ करतात. पण त्याला बिडी-काडीला लागणारा पैसा त्याला मिळत नाही. दाढी-केस वाढले तरी ते कापण्यासाठी मुले त्याला पैसे देत नाहीत. इब्लिस अंडी, मटण, चिकन खाण्याची स्वप्नं पाहत असतो.

आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेने सगळा महार समाज नागपूरला रवाना होतो. इब्लिसची मुले, सुनाही नागपूरला जातात. संतराम ठेकेदार हा कोळसा उतरवण्याचा ठेका येत असतो. संतरामकडे महार वाड्यातील कामगार कामाला जात असतात. कोळशाची वॅगन उतरण्यासाठी प्रत्येकाला पंधरा ते वीस रूपये मिळत असतात. संतरामला एक कोळशाची वॅगन उतरवण्यासाठी प्रत्येकाला पंधरा ते वीस रूपये मिळत असतात. संतरामला एक कोळशाची वॅगन उतरण्यासाठी कामगार हवे असतात म्हणून तो इब्लिस मास्तरच्या घरात येतो. पण संपूर्ण समाजात त्याला कोणी कामगार भेटत नाही. तेव्हा वीस रूपयेसाठी इब्लिस मास्तर तयार होतो. संतराम इब्लिसला दहा रूपये देऊन जातो.

इब्लिसच्या घरात कोणीच नसते. तो खूप खुश होतो. कारण बऱ्याच दिवसानंतर अंडी, मटण, पाखरू खाण्याचं त्याचं स्वप्न पूर्ण होणार असते. इब्लिस मिळालेल्या पैशातून पाच रूपयेची चार अंडी घेऊन येतो. चारीच्या चारी अंडी चूल पेटवून उकडून घेतो. अंड्यासोबत खायला त्याच्या घरात काहीच नसते. फक्त मिठासोबत चारही अंडी इब्लिस खाऊन कोळशाची व्हॅगन रिकामी करायला निघतो. थोडे अंतर चालल्याने त्याच्या पायाला उन्हामुळे चटके बसतात. इब्लिस आपल्यासोबत घेतलेले घोंगड्याचे दोन तुकडे दोन्ही पायाच्या तळव्यांना बांधतो. कसाबसा लंगडत लंगडत मिल गाठतो.

दुपारच्या भर उन्हात इब्लिस व्हॅगनचे दरवाजे उघडून कोळसा भराभर खाली उतरण्याचा प्रयत्न करतो. "कधी उजव्या मनगटाचा रेटा, तर कधी डाव्या मनगटाचा जोर, कधी चांगल्या तळव्याची हिंमत, तर कधी पिचल्या पायाची जिद्द, कोळशाशी घनघोर टकरा देत होती."[७] पुष्कळसा कोळसा इब्लिस बाहेर फेकतो. मधेच बिडी ओढण्यासाठी थांबतो. खाल्लेली चार अंडी कधीच जिरून जातात आणि त्याला कडकडून भूक लागते. पण संध्याकाळपर्यंत व्हॅगन रिकामी करायची असते. त्यामुळे जेवायला जाण्याचा विचार इब्लिस सोडून देतो. पुन्हा जोमाने कामाला लागतो.

इब्लिस व्हॅगनचा दुसऱ्या बाजूचा दरवाजा खोलण्याचा प्रयत्न करतो, पण काही केल्या तो उघडत नाही. थोडा ढिला होऊन अडकून राहतो. इब्लिस त्याचा नाद सोडून कोळसा त्याच्यावरून फेकू लागतो. मधेच तो स्वत:शी बोलू लागतो. "साला मास्तर, किती दिसात तोंडात पाखरू पडले नाही तुया. आता सन्तरामने पैसे दिले की, बजार के होटल में पंजाबी मुर्गी, गवळी-पुऱ्यातल्या गरम गरम मसाल्यातल्या मोहाचा ग्लासभर दारूचा रंग केल्यावरच झोप काढायला पाहिजे."[८] इब्लिसला तहान लागते. व्हॅगनच्या दरवाजावर हात टेकवून तो खाली उतरण्याचा प्रयत्न करतो. तेंव्हा ढिला झालेला दरवाजा अचानक उघडला जातो. इब्लिस खाली पडतो. काही समजण्याच्या आत इब्लिस कोळशाच्या ढिगाऱ्याखाली गाडला जातो. इब्लिसने पाहिलेली स्वप्नं शेवटी अपूर्णच राहतात.

**आतल्या आत**

"आतल्या आत" ही कथा एका महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या कृष्णा नावाच्या विद्यार्थ्याची आहे. ह्या विद्यार्थ्याच्या घरची परिस्थिती गरिबीची आहे. त्यामुळे तो स्वत: काही तरी छोटी मोठी कामं करून स्वत:च्या शिक्षणाचा खर्च भागवतो. खूप शिक्षण घेण्याची त्याची इच्छा असते. शिक्षणासाठी पैसे कमवतानाच त्याच्यावर बलात्कार होतो. बलात्काराची वाच्यता तो कोणाजवळही करत नाही पण स्वत: 'आतल्या आत' झुरत राहतो.

कृष्णा मुंबईतील एका झोपडपट्टीत राहतो. कृष्णाचे आई-वडील दोघेही कापड मिलमध्ये काम करतात. आई दिवस पाळीत तर वडील रात्रपाळीत काम करतात. कृष्णा अतिशय हुशार असतो. तो मॅट्रिक पास होतो. तेंव्हा कृष्णाच्या मोठ्या चुलत भावाच्या सांगण्यावरून त्याला कॉलेजमध्ये घालण्यात येते. "कधी शनिवारी-रविवारी गवंड्याच्या हाताखाली, केंव्हा भुश्श्यांच्या कारखान्यात कधी कोळशाच्या वाघीण कामावर, तर असेच काहीतरी करून, कृष्णा वह्यापुस्तके घेत होता."[९] कृष्णा जिद्दीने शिक्षण घेत असतो. कृष्णाला कोठेही काम भेटत नाही. तेंव्हा तो रात्री सायकलरिक्षा



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

चालवण्याचे ठरवतो. कृष्णा धेडा महाराची सायकलरिक्षा रात्रीला दोन रूपये भाड्याच्या बोलीवर चालवायला घेतो. घरातील आई-वडील रात्री रिक्षा चालवण्याच्या कामावर जाऊ देणार नाहीत म्हणून तो त्यांच्यापासून चोरून रिक्षावर जातो. कृष्णाला रिक्षावल्यांचे नियम माहिती नसतात. इतर रिक्षावाल्यांनी जास्त भाडे सांगितले तर कृष्णा कमी भाडे घेऊन जाऊ लागतो. "त्या आठवड्यात तर त्याने तीन वेळा रामलिंग रजपूतचे, चार वेळा माजिदचे आणि तसेच दोन-तीनदा इकबाल रिक्षावाल्याचे गिऱ्हाइक तोडले होते."[१०] कृष्णा पैसे कमावण्यासाठी एका मागून एक चूका करत जातो. एक-दोन वेळा माजिद व इकबाल, कृष्णाला शिवीगाळ, धक्काबुक्कीही करतात. पण कृष्णा ह्या सगळ्यांकडे दुर्लक्ष करतो.

कृष्णा रात्री रिक्षा चालवून पहाटे आई उठायच्या आत घर गाठत असतो. रात्री झोपताना त्याच्या पायांना असंख्य वेदना होत असतात. डोळ्यांना त्रास होतो. डोके जड होत असते. एवढे सहन करून कृष्णा सकाळी कॉलेजला जात असतो. कृष्णाला तीन-चार तासच झोप घेण्याची सवय लागते. रिक्षा चालवून मिळणाऱ्या पैशात वह्यापुस्तके, कपडेलत्ता, घरात अडीनडीला तो पैसे देऊ लागतो. पण लोकांना कमी भाड्यात घरी पोहचवण्याचे काम काही तो कमी करत नाही.

कृष्णाच्या कमी भाडे घेण्याच्या सवयीमुळे इकबाल, माजिद, रजपूत वैतागतात. एके दिवशी ते तिघे बनावट गिऱ्हाईक कृष्णाच्या रिक्षात बसवतात आणि त्याला रेल्वेपुलाच्या अंधाऱ्या जागेत नेतात. तेथे त्याच्या रिक्षाची हवा सोडतात. कृष्णाला मारहाण करतात आणि शेवटी त्याच्ये संपूर्ण कपडे काढून त्याचा लैंगिक छळ करतात. कृष्णा सात आठ दिवस विव्हळत राहतो. आतल्या आत झुरत राहतो. त्याच्या मनात सूडाचे विचार येतात. पुन्हा आपल्या शिक्षणाचा विचार करून तो न घाबरता रिक्षा चालवू लागतो, कॉलेजला नियमितपणे जाऊ लागतो.

केशव मेश्रामांनी ह्या कथेमध्ये कृष्णाच्या शिक्षण घेण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे दर्शन घडवले आहे. कृष्णावर लैंगिक अत्याचार होऊनही शिक्षणासाठी तो पुन्हा सगळे

विसरून शिक्षणात दंग होतो. तसेच मेश्रामांनी कृष्णाचा लैंगिक छळ करणाऱ्या रिक्षा चालकांची मानसिकता चित्रित केली आहे.

**आंबूसतांबूस ऊब**

'आंबूसतांबूस ऊब' ही कथा विठ्ठल नावाच्या एका भुरट्या चोऱ्या करणाऱ्या मुलाची कथा आहे. विठ्ठल परिस्थितीमुळे चोरीच्या व्यवसायात गुंततो. विठ्ठलला चोऱ्या करण्याशिवाय दूसरा पर्याय उपलब्ध नाही. घरातील लोकांशी विठ्ठलचे पटत नाही. त्यांचे वागणे त्याला रूचत नाही म्हणून तो घराबाहेर पडतो आणि आपल्या जीवनाची दुर्दशा करून घेतो.

विठ्ठलचा बाप अकोल्यातील एका कापड मिलमध्ये असतो. चांगला पगार मिळवत असतो. पण त्याची सगळी कमाई बायकोच्या आजारामध्ये खर्च होत असते. तिने सतरा मुलांना जन्म दिलेला असतो. त्यातील इमली, विठ्ठल आणि रूक्मिणी ही तीनच मुले जिवंत राहतात. बाकीचे सर्व मृत्यूमुखी पडतात. वडील लक्ष्मण दारूच्या नादाला लागून एकदा मिलमध्ये कापडाची चोरी करतो. लक्ष्मणला नोकरीवरून कमी केले जाते. मिलमधील जमा पैसेही त्याला दिले जात नाहीत. अनेक पुढारी त्याला पैसे मिळवून देतो म्हणून लुबाडतात. लक्ष्मण घरी बसून राहतो. विठ्ठलची तिसरीतूनच शाळा बंद होते. मोठी बहिण सगळे घर चालवते.

विठ्ठल दिवसभर बाजारात फिरतो. बाजारातील फळे चोरून खातो, कोणत्याही घरातील हंडा, घंघाळ, तांब्या-पितळेची भांडी उचलतो. ही चोरीची भांडी नेऊन मारवाड्याला विकतो. विठ्ठलवर कोणाचेही नियंत्रण नसते. वडील दारू पिऊन पडतात. मोठी बहिण आपला बाप, बहीण, भाऊ ह्यांच्यासाठी अनेकांशी शरीरसंबंध ठेवते आणि घर चालवते. बहिणीच्या ह्या सगळ्या गोष्टी विठ्ठलच्या नजरेस पडत असतात. विठ्ठल चिडत असतो पण तिच्या जीवावरच खात असतो. बहीणीला तो शिव्या देतो, वाईट बोलतो. "इमली जगण्याचा मार्ग म्हणून नाईलाजाने देहविक्रय करते आहे."[११] इमली

एक चांगली मुलगी असते. कारण ती आपल्या कुटुंबाचा सांभाळ करते. विठ्ठलने चोऱ्या केलेले तिला आवडत नसते. विठ्ठल एकदा फळवाल्यांचे पैसे चोरताना सापडतो. फळवाले त्याला पोलीसांच्या ताब्यात देतात. इमली तेव्हा त्याला मामाच्या गावी पाठवते.

विठ्ठल मामाच्या घरी जातो. चार-पाच दिवस मामाच्या घरी शांतपणे राहतो. नंतर तो रेल्वेस्टेशनवर फिरण्यासाठी जाऊ लागतो. रेल्वे स्टेशनवर एकदा तो हमाली करतो. अमरावतीला जाऊन सिनेमा, हॉटेलमध्ये जेवण करून मामाकडे परततो. मामाला मधू नावाचा मुलगा आणि सुमन नावाची मुलगी असते. ''मधू शाळेत गेला की समुन त्याला सारखी सतावत होती. आंधळ्या आजीचा फायदा घेऊन सिनेमातल्या बायांसारखे त्यांच्या आंगाखांद्याला भिडत होती.''[१२] पण विठ्ठल तिच्याकडे दुर्लक्ष करतो. मामा-मामी घरात असतील तरच घरात थांबतो नाहीतर दिवसभर बाहेर भटकतो. भूक लागली की नेहमीप्रमाणे बाजारात चोऱ्या करतो.

विठ्ठल मामाच्या घरी मजेत असतो. पण सुमन त्याला सरळ जगू देत नाही. तो सुमनकडे दुर्लक्ष करतो म्हणून सुमन आपल्या आईला विठ्ठल तिला अंघोळ करत असताना पाहतो असे खोटे सांगते. विठ्ठलच्या मामाला ही गोष्ट समजते तेंव्हा मामा त्याला घरातून जाण्यास सांगतो. विठ्ठल संतापतो. रागाने मामा-मामी; सुमनची कपडे गठळ्यात बांधून फेकून देतो. मामाच्या घरातील पितळेची बादली, घंघाळ मारवाड्याला विकतो आणि सुमनला बडबडून निघून जातो.

विठ्ठल आकोल्याला घरी परत येतो. घरात येताच त्याची बहीण इमली एका वयस्कर पुरूषासोबत दिसते. विठ्ठलची मानसिकता पुन्हा बिघडते. तो दारू प्यायला शिकतो. एकदा दारूच्या नशेत वडीलांना काठीने झोडपून काढतो. वडील त्याला घरातून बाहेर काढतात. विठ्ठल तेंव्हापासून बडनेर-अमरावती गाडीमध्ये चोऱ्या करून स्टेशनवरच राहतो. विठ्ठल भिकाऱ्यांच्या पंक्तीत जाऊन बसतो. आजारी पडतो. त्याला

काम होत नाही. प्लॅटफॉर्मवर पडलेले खरकटे खाऊन तिथेच झोपू लागतो. एके दिवशी थंडी वाजत असल्याने एका महारोग्याच्या घोंगड्यात शिरून झोपतो. तो महारोगी मेलेला असतो. सकाळ झाल्यावर विठ्ठलला पोलीसांच्या चौकशीला सामोरे जावे लागते.

विठ्ठलचे वडील चोरीत सापडल्याने सगळा समाज विठ्ठललाही चोर ठरवतो. म्हणून विठ्ठल चोऱ्या करतो. "विठ्ठल कोसरे परिस्थितीमुळे चोऱ्या करतो पण मनाने वाईट नाही. सुमन या आपल्या मामेबहिणी शीतो अनीतीने वागत नाही."[१३] विठ्ठलला बहिणीचे अनैतिक संबंधही पसंत नसतात. मेश्रामांनी ह्या कथेत एका चांगल्या व्यक्तीला परिस्थिती कशाप्रकारे वाईट वागण्यास भाग पाडते ह्याचे चित्रण केले आहे.

**नुसात्या**

'नुसात्या' ही कथा एका गरीब कष्टकऱ्याच्या मोठेपणाची कथा आहे. कथेतील नायक गरीब आहे. पण त्याला आपल्या पाहुण्यांचा पाहुणचार करण्यासाठी अनेकांसमोर हात पसरावे लागतात. कोणीही त्याला पैसे देत नाहीत. उधार वस्तू देत नाहीत. पण शेवटी काहीतरी खटपट करून तो आपल्या पाहुण्यांचा पाहुणचार करतो.

प्रस्तुत कथेच्या नायकाचे नावच 'नुसात्या' आहे. नुसात्या दलित आहे. दलित वस्तीतच त्याचे घर आहे. नुसात्या खुदाई आणि जमीन तयार करण्याचे काम करतो. उलपी ही नुसात्याची बायको, तीही मोलमजुरी करून संसाराला हातभार लावते. दोघांना भुलाबाई नावाची एकुलती एक मुलगी असते. "मुलीचे भुलाबाईचे लग्न करून त्यांनी दोघांनी जमवलेले साठ रूपये खर्चून टाकले होते. पाच-सात रूपये रोजात दोन वेळचा दोघांचा खर्च, कपडालत्ता, बाजारहाट, तेल-तंबाकू यांचा पुरवठा करताना शिलकीला राहायची नुसती चिंता."[१४] पण नुसात्या आणि उलपी आपल्या संसारात काटकसरीने दिवस काढत असतात. उलपी सतरा ठिकाणी फाटलेल्या साडीला गाठी मारून ती वापरत असते. घरात खायला काही नसले तर दोघे भाकरी मीठ-मिरचीच्या पाण्यात भिजवून खातात. पण आपल्या मुलीचे उलपीचे चांगले झाले म्हणून आनंदात असतात.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

नुसात्याची मुलगी गरोदर राहते आणि ती बाळंतपणासाठी त्याच्या घरी येणार असते. नुसात्या आपल्या मुलीच्या बाळंतपणासाठी पैसे जमवू लागतो. एका ठिकाणी कामाला जातो आणि आपल्या बायकोसाठी तेथून साडी चोरून आणतो. उलपीला ती दसऱ्याच्या दिवशी द्यायचे ठरवून ती जोलीबाईच्या घरात ठेवते. जोलीबाई त्याच्याकडे ती साडी दहा रूपयाला मागत असते. पण नुसात्या तिला ती देत नाही. नुसात्या कामाच्या पैशातून मुलीच्या बाळंतपणाच्या तयारीला लागतो. घरात बाजलं आणून ठेवतो. सुईणीला सांगून ठेवतो.

नुसात्याची मुलगी एके दिवशी अचानक येते तिच्यासोबत तिचा सासू-सासरा आणि दीर येतात. नुसात्या उलपी त्यांचे स्वागत करतात. पण घरी आलेल्या पाहुण्यांचा पाहुणचार कसा करायचा ह्या विचारात तो बुडून जातो. उलपी जवळ असलेला एक आणा दूध आणण्यासाठी देते. पाहुणे चहा पिऊन खूश होतात. नुसात्या पाहुण्यांना मटण, दारू आणण्याच्या तयारीला लागतो. नुसात्या बाहेर जाऊन लोकांच्या हातापाया पडून हातभट्टीची दारू आणि मटणवाल्याजवळ उरलेले वझडी-पार आणतो. इवाई-इवाई हातभट्टीची दारू पित वझरी आणि पार संपवतात. उलपी नुसात्याला मटण आणण्यास सांगते. तेंव्हा नुसात्या कुऱ्हाड घेऊन रानात जातो. ससे, बगळे शोधू लागतो. पण तेही मिळत नाहीत. शेवटी त्याच्या हाताला एक कुत्री लागते. तिला मारून नुसात्या घरी नेतो. उलपी मटण शिजवून सर्वांना खायला घालते. पण "तिच्या केकटण्याचा, रक्ताचा, पोटातल्या रक्तारेंदाचा चिखल नुसात्याच्या डोळ्यापुढून हालत नव्हता."[१५] नुसात्या फक्त भाकरी आणि पाणीच पेत असतो.

प्रस्तुत कथेत मेश्रामांनी दलित समाजाच्या लोकांच्या परिस्थितीचे वर्णन केले आहे. तसेच मुलीच्या सासरच्या परिस्थितीचे वर्णन केले आहे. मुलीच्या सासरच्या लोकांच्या पाहुणचारामध्ये कोणतीही कमतरता भासू नये म्हणून धडपडणाऱ्या बापाचे चित्रण केले आहे. परिस्थिती माणसाला कशाप्रकारे वाईट वर्तन करायला लावते, मानवाला कोणत्या थराला नेऊन बसवते ह्याचे मन हादरून टाकणारे चित्रण मेश्रामांनी केले आहे.

**हादरा**

'हादरा' ही कथा एका वकीलाच्या मनोवस्थेची कथा आहे. समाधान शेंडे हा वकीली करतो. त्याला समाजाबद्दल खूप आस्था आहे. समाजकार्य करता करता तो आपल्या कुटुंबाकडे लक्ष देत नाही. त्यातच त्याचे सर्व कुटुंब उध्वस्त होते. कुटुंब उध्वस्त होण्याला तोही कारणीभूत आहे. ह्या समाधान शेंडेच्या मानसिक ताणतणावाची ही कथा आहे.

समाधान शेंडे हा काम करून शिक्षण घेतो. कॉलेजला असताना तो रेल्वेखात्यात काम करतो. रेल्वेत काम करता-करता तो एल.एल.बी ची पदवी प्राप्त करतो. कॉलेजमध्ये असताना त्याची मुक्ताशी ओळख होते. मुक्ता म्युनिसिपालिटीत काम करत असते. समाधान आणि मुक्ताच्या ओळखीचे रूपांतर प्रेमात होते. दोघे लग्न करतात.

समाधान आणि मुक्ताचा संसार सुरळीत चालू होतो. समाधान चळवळीच्या केसेस लढवतो. तसेच समाधान एक चांगला वक्ताही असतो. अनेक ठिकाणी भाषणे देण्यासाठी तो जात असतो. रेडिओवरदेखील काही वेळा त्याची भाषणे होतात. वकीली करून बरांच पैसा मिळवतो. फ्लॅट घेऊन मुक्ताला सुखात ठेवतो. काही वर्षात त्यांना तीन मुले होतात. समाधान घर सांभाळून मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडतो. पण एका अटळ क्षणी अलका पुरंदरे नावाच्या स्टेनोग्राफरशी त्याची ओळख होते. ही ओळख वाढत जाऊन त्या दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण होतात. हे प्रेम खूपच वाढत जाते. दोघेही कामाचे निमित्त करून दोन-तीन दिवसांसाठी लोणावळा, खंडाळ्याला, जाऊ लागतात. यातूनच अलका गरोदर राहते. दोघेही रोज दोन-तीन तास एकमेकांसोबत घालवत असतात. समाधान आणि अलका दोघेही विवाहित असतात त्यांना विवाहबाह्य संबंध ठेवण्यात कोणतीही हरकत नसते. ह्या विवाहबाह्य संबंधामुळेच समाधान शेंडेच्या संसारात वादळ निर्माण होते.

समाधान आणि मुक्ताचा आंतरजातीय विवाह झाला होता. मुक्ताच्या घरचे गुजराती जैन होते. समाधान दलित होता. मुक्ताच्या बहिणी, इतर पै-पाहुणे तिच्याकडे ये-जा करत होते. पण ते नेहमी समाधानच्या जातीवरून मुक्ताला टोमणे मारत असत. तेंव्हापासून त्या नेहमी त्याच्या जातीवरून बोलतात. "ह्या लोकांत लहानपणीच लग्नं होतात. नाना व्यसनं असतात. रंगढंग चालतात. एका बायकोत त्यांचे कधी भागतच नाही. मारझोड करतात. काय नं काय..."[१६] समाधान चुकलेला असतो त्यामुळे तो त्यांचे बोलणे सहन करतो. पण मनाने अधिकच खचत जातो. मुक्ताही समाधानशी फटकून वागायला लागते.

समाधान शेंडे आपलं दु:ख, नाराजी कमी करण्यासाठी अलकाला भेटण्याचा प्रयत्न करतो. अलकाही काही दिवसानंतर त्याला भेटण्यास टाळाटाळ करते. घरात कोणीही समाधानशी बोलत नाहीत. मोठा मुलगा सुबोध समाधानला टाळत असतो. मुलगी शैला तर समाधानला परपुरूष समजून त्याच्या समोरही येत नाही. छोटा मुलगा सुजीत फक्त त्याच्याशी बोलत असतो. समाधानचा आपल्या मुलांवर कोणत्याही प्रकारचा धाक राहत नाही. मुलगी शैला दोन वेळेस पर पुरूषांसोबत दिसते. तेंव्हा समाधानचा राग अनावर होतो. पण तो काहीच करू शकत नाही. समाधानची मनस्थिती बिघडते. तो उस्मान अत्तारला फोन लावतो आणि दोन व्यक्तींना मारण्याची सुपारी देतो. पण सुपारी देताना स्वत:चा अंधेरीचा पत्ता सांगतो.

समाधान दलित समाजातील आहे. त्यामुळे त्याच्या सासरवाडीची माणसे त्याला त्याच्या जातीवरून टोमणे मारतात. समाधानच्या चुकीमुळे त्याच्या जातीचा उद्धार केला जातो. मेश्रामांनी ह्या कथेत माणूस स्वत: चुकीचे वागला तर त्याच्या घरचे लोक त्याला किंमत देत नाहीत, समाज त्याला नाकारतो आणि तो स्वत:च स्वत:चे जीवन कशाप्रकारे उध्वस्त करून घेतो ह्याचे चित्रण केले आहे.

**छलांग**

'छलांग' ही कथा या कथासंग्रहातील इतर कथांपेक्षा एक वेगळी कथा आहे. कथासंग्रहातील इतर कथा ह्या मुंबईतील झोपडपट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या आहेत. तसेच काही कथा पांढरपेशा लोकांच्या बाहेरख्यालीपणाच्या आहेत. पण 'छलांग' ही कथा खेडेगावात राहणाऱ्या एका तरूणाच्या धाडसाची आहे. कठीण प्रसंगातून तो कशी छलांग मारतो ह्याची ही कथा आहे.

'छलांग' कथा ही वऱ्हाड भागातील शेतकऱ्याच्या मुलाची कथा आहे. राऊ आणि तानू हे दोघे भाऊ आाहेत. राऊ हा मोठा तर तानू हा छोटा भाऊ आहे. तानू हा वयाने अवघ्या सोळा वर्षाचा आहे. पंधराव्या वर्षीच त्याचा साखरपुडा होतो. "तानू अंगाने सडसडीत होता; पण आखाड्याच्या मातीत त्याचे शरीर कसलेले होते."[१७] तानू इतर मुलांप्रमाणेच घरच्यांना चुकवून बिड्या ओढतो. घरच्या आणि शेताच्या कामात तो वडील आणि भावाला मदत करतो.

पावसाळ्याच्या आगोदर गावातील सगळ्याच्या पेरण्या होतात. रानूही भाऊ आणि वडीलांसोबत लावणी करतो. लावणी झाल्यानंतर दोघेही भाऊ शेतांच्या रक्षणासाठी शेतीच्या भोवतीने बाभळीच्या काटेरी फांद्या रोवतात. पण कुंपनासाठी फांद्या कमी पडतात. मोठा भाऊ घरी जातो. तानू एकटाच बाभळीच्या फांद्याशेजारी थांबतो. बैलांना पाणी पाजून मोकळे सोडतो. भाऊ बराच वेळ येत नाही. रात्र होण्याच्या चिंतेने तानू एकटाच बैलगाडी घेऊन जंगलात शिरतो. स्वत:जवळील कुऱ्हाडीने बाभळीच्या फांद्या तोडून गाडी भरतो.

बाभळीने गाडी भरल्यानंतर तानू बैल गाडीला जोडतो आणि घराची वाट धरतो. अंधार वाढत जातो. तानू बिडी ओढण्यात मग्न होतो. तेवढ्यात त्याच्या गाडीचे चाक खड्यात अडकते. तानू अंधारातच गाडीचे चाक बाहेर काढतो. पण चाक निघताच बैल उधळतात आणि गाडी उतरणीला लांबवर जाऊन थांबते. समोरच्या वाळूत एक

चित्ता बसलेला असतो. तो मोठ्याने गर्जना करतो. तानू घाबरून जातो. पण धाडसाने गाडीखाली जातो. गाडीखालचा कंदील घेऊन त्यातील रॉकेल बाभळीच्या फांदीवर ओततो. पटकन काढी ओढून फांदी पेटवतो. चित्ता आणखी खवळतो. तानू पेटती फांदी घेऊन बैलांच्या पुढे उभा राहतो. तसा चित्ता घाबरून पळून जातो.

मेश्रामांनी 'छलांग' ह्या कथेतून एका वयाने लहान असणाऱ्या मुलाच्या धाडसाचे चित्रण केले आहे. खेडेगावात असे अनेक प्रसंग येतात आणि त्याला तिथली लोकं कशी सामोरे जतात ह्याचे चित्रण करणारी ही कथा आहे.

**शक्कल**

'शक्कल' ही कथा एका शक्कल लढवणाऱ्या लहान मुलाची आहे. मुले जरी लहान असली तरी त्यांनाही चांगल्या वाईटातील फरक ओळखता येतो. मुले चांगल्या कामासाठी कशी शक्कल लढवतात ह्याची आपण कल्पनाही करू शकणार नाही. अशीच शक्कल लढवणाऱ्या विकासची ही कथा त्याचे कौतुक करणारी ठरते.

विकास हा चौथीच्या वर्गात शिकणारा मुलगा आहे. शैला नावाची त्याला मोठी बहीण आहे. विकास इतर लहान मुलांप्रमाणेच कडमडी आहे. दिवसभर कोणत्या ना कोणत्या उचापत्या करण्यात मग्न असतो. फुलपाखरांच्या मागे धावणे, त्यांना पकडून आगपेटीत ठेवणे इत्यादी गोष्टी करत असतो. तसेच फुलपाखरू मेले तर दैवाकडे दया मागण्यासाठी ते आजोबांच्या पोथीत ठेवतो. बाबांच्या कोटाला बूट पॉलिश करण्याच्या ब्रशने साफ करतो आणि कोट खराब करून मावशीच्या घरी पळून जातो. विकास कोणतेही काम निटपणे करत नसतो. कोणतेही काम करताना ते काम कमी करण्यापेक्षा वाढवून ठेवत असतो. म्हणून त्याला घरातील कोणीच काम सांगत नाहीत. घरातील प्रत्येकजण त्याच्यावर रागवतात.

विकासची बहीण कॉलेजमध्ये शिक्षण घेते. दोघांचे जराही पटत नाही. विकास तीला घाबरत नाही. नेहमी तीला सतवतो. घरातले नेहमी त्याला बाहेर जाण्यास

सांगतात. ''ते नेहमीचेच होते. तिच्याकडे कुणी आल की, त्याने बाहेर जायचे. आईकडं कुणी आलं की, त्यालाच बाहेर जायला सांगायचे.''[१८] विकास खूप वैतागून जातो. शैला त्याला बाहेर जाण्यास सांगते. पण तो जागचा हालत नाही. शेवटी बाबांना काहीतरी सांगण्याची धमकी देत तो बाहेर निघून जातो.

एके दिवशी गंमत म्हणून विकास शैलाचे आणि तिच्या मैत्रिणींची नावे एका कागदावर लिहितो. त्यांच्या नावापुढे मुलांची नावे लिहितो. शैलाच्या नावापुढे दिनकर शेलार असे नाव लिहितो. तो कागद वडीलांच्या कपाटात ठेवतो. विकासच्या वडीलांच्या हातात तो कागद पडतो, वडील शैलावर रागवतात. शेवटी शैलाचे लग्न करण्याचा निर्णय घेतात. विकासमुळे शैलाच्या लग्नाची गोष्ट सुरू होते. विकासला आपण केलेल्या कृत्याचा राग येतो. म्हणून ती त्याच्याशी बोलत नाही. तो शैलाचे लग्न मोडण्याचे ठरवतो. त्यासाठी तो शक्कल लढवतो. शैलाला बघायला येणाऱ्या मुलाचे प्रेमप्रकरण विकसला माहिती असते. तो शैलाला सांगतो. आणि मुलगा तिला बघायला आल्यानंतर शैलाला तो विषय मुलाजवळ काढायला सांगतो. शैला विकासने सांगितल्याप्रमाणे करते. शैलाचे लग्न मोडते. तेव्हापासून शैला विकासला कधी रागवत नाही. विकासही तिला सतवत नाही.

केशव मेश्रामांनी ह्या कथेत एका खोडकर मुलग्याचे चित्रण केले आहे. तसेच भाऊ बहीणींच्या जिव्हाळ्याचेही चित्र रेखाटले आहे. विकास सारख्या लहान मुलाला आपल्या कृत्याचा पश्चाताप होणे ही आश्चर्याची गोष्ट या कथेत घडून आली आहे. आपल्या बहीणीचे नुकसान होऊ नये यासाठी योग्य वेळी योग्य शक्कल लढवणे ही त्या मुलाच्या मानाने खुप मोठी बाब येथे दर्शवण्यात आली आहे.

### भूक

'भूक' ह्या नावावरूनच या कथेचा आशय पटकन समजण्यास मदत होते. कथानक पाहत असतानाच या शिर्षकाचे प्रयोजन समजून येते. ह्या कथेत चार

देवरश्यांच्या भूकेचे वर्णन करण्यात आले आहे. चार मित्र जेवणासाठी असुसलेले असतात. ह्या मित्रांना मांसाहारी जेवणाची खूप चटक असते. ह्या मांसाहारासाठी हे मित्र काय काय करतात ह्याचे दर्शन या कथेत घडवण्यात आले आहे.

लखू डोंगरे, भिमा कलार, फदल्या आणि शिवराम तेली हे चौघे मित्र असतात. "भूताखेतांचे उतारे काढणे, अंगारे धुपारे करणे, भारून राख देणे, विंचू, साप तसेच पिसाळलेले कुत्रे उतरविणे अशा तारण-मरणाच्या कामात त्यांच्या कितीतरी पिढ्या सरकल्या होत्या."[१९] लखू, भिमा आणि फदल्या एका गावचे आहेत. शिवराम तेली शेजारच्या गावचा असतो. पण तोही इलम जाणणारा असल्याने ते तिघे त्याला कधी कधी आपल्या सोबत नेतात. यातील भिमा कलाराचा गावात दारूचा धंदा असतो. गावावर त्याची वचक असते. लघू डोंगरे देवरशाचे काम करत असल्याने त्याला बाजारातून धान्य किंवा वस्तू विकत आणून खाण्याची परवानगी नसते. लखूला अनेक लोकांकडून अन्न-धान्याचा पुरवठा होतो. श्रद्धेने लोक त्याला सगळा बाजार भरून देतात. चौघेही मांसाहारासाठी धडपडणारे आहेत. तेव्हा कोणताही उतारा सांगताना कोंबडी किंवा बकऱ्याचाच उतारा सांगतात. शिवराम तेली सगळ्यात जास्त जेवतो त्यामुळे भिमा, लखू आणि फदल्या शिवरामला कधीतरीच जेवणाला बोलावतात. ते तिघेच नेहमी मटणाचा, कोंबडीचा बेत आखतात.

शिरोडा गावातील पटवारी नावाच्या सावकाराच्या मुलग्याचे लग्न होते. लग्नानंतर महिन्याभरातच सून वेड्यासारखी वागू लागते. तिच्यावर अनेक औषधांनी उपचार केला जातो. पण तिला बरेच वाटत नाही. तेव्हा लखू डोंगरे, भिमा कलार, फदल्या आणि शिवराम या चौघानाही पटवारी बोलावून घेतो. ह्यातील तिघे एकीकडे आणि शिवराम एकीकडे असतात. गावकरी आणि पटवारी यांच्या मते, "सात असरांनी तिला झपाटले. चांगल्या इलम जाणऱ्यांचीच आता झाडाची सुटका होईल."[२०] चौघेही चार दिवस पटवाऱ्याच्या सुनेची सुटका करण्याचा प्रयत्न करतात. चौथ्या दिवशी त्यांना यश येते.

तिघे शिरोडकर आणि शिवराम वेताळला नैवेद्य दाखवण्याचे सुचवतात. पण दिवसांवरून त्यांच्यात मतभेद होतात. शिवराम अमावस्येची रात्र सुचवितो आणि हे तिघे द्वादशीचा दिवस सुचवतात. मतभेद वाढत जाऊन ते हमरीतुमरीवर येतात. शेवटी द्वादशीची रात्र ठरवली जाते. लखू डोंगरे पाच-सात कोंबड्यांचा उतारा सांगणार असतो तोच शिवराम दोन कोंड्यांचा उतारा सांगतो. डोंगरे संतापतो. शेवटी चौघेही नदीवर जातात मग्न होऊन पुजा करतात. कोंबडी, भात नदीच्या घाण पाण्यातच शिजवतात. भात त्यांना घाण लागतो. ते पुन्हा दुसरा भात घालतात. दारू पिऊन जेवतात.

मेश्रामांनी ह्या कथेत भूक माणसाला कसे वागायला लावते ते दाखवून दिले आहे. तसेच लोक कशाप्रकारे अंधश्रद्धा पाळतात ह्याचे सुक्ष्म वर्णन केले आहे. अंधश्रद्धेचा फायदा देवरशी आपली भूक भागवण्यासाठी कसा उठवतात ह्याचे चित्रण केले आहे.

**पाठपुरावा**

'पाठपुरावा' ही कथा एका अबला स्त्रीच्या जीवनाची आहे. स्त्री ही पुरूषांच्या आत्याचाराला बळी पडते. पुरूष नेहमी स्त्रीवर आपला हक्क गाजवतात. असाच एक पुरूष आपल्या पत्नीवर हक्क गाजवण्याचा प्रयत्न करतो. पण त्याची ही हक्क गाजवण्याची पद्धत अगदी विक्षिप्त आहे. ह्या कथेतील हा पुरूष आपल्या पत्नीला परपुरूषाशी अनैतिक संबंध ठेवण्यास भाग पाडतो. पतीच्या या कृत्याचा निरापराध पत्नी बळी कशी ठरते ह्याची ही कथा आहे.

'पाठपुरावा' कथेतील नायिका सुलकी एक गरीब घरातील मुलगी आहे. तिला अगदी श्रीमंत घरातला एकुलता एक असणारा पती मिळतो. सुलकी आणि तिच्या घरातले सर्व नातेवाईक खुश होतात. इतक्या गरीब घरातली मुलगी मोठ्या घराची सून झाली म्हणून लोक अश्चर्य करतात. पण या आश्चर्याचा धक्का सुलकीला बसतो. तिचा नवरा रोज रात्री तिच्याकडे लक्ष न देता झोपी जातो. असे महिना, दोन महिने रोजच



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

चालू असते. घरातील सगळे लोक बाहेरगावी जातात. ''रात्र वाढू लागल्यानंतर तो तिला गळ घालू लागला की, त्याच्या दोषाची जाणीव जगाला होता उपयोगाची नाही.''[२१] सुलकीचा नवरा लहानपणी झाडावरून पडल्यानंतर त्याचे पौरूषत्व नष्ट झालेले असते. ''डॉक्टर झाले, वैद झाले; पण त्यात कधी यंश आले नव्हते, येणार नव्हते आणि म्हणूनच एवढ्या भिकारी घरातील पोर सुलकी बळी म्हणून निवडली होती.''[२२] सुलकीला आपल्या नवऱ्याच्या नपुंसकत्वाची जाणीव होते तेव्हा तिला मेल्याहून मेल्यासारखे वाटते.

सुलकी नवऱ्याचे सत्य स्विकारून त्याच्याजवळ राहते. पण नवऱ्याच्या तिच्याकडून अपेक्षा वाढतच जातात. आपल्या नपुंसकत्वाची जाणीव जगाला होऊ नये यासाठी तो सुलकीला त्याच्या मित्राशी संबंध ठेवून मूलाची मागणी करतो. नवऱ्यापुढे ती हतबल होते आणि आपले शरीर पर पुरूषाच्या ताब्यात देते. तिच्या मनाला ही गोष्ट पटत नाही, तरीही ती हे सर्व निमूटपणे सहन करते. नवऱ्याचा हा मित्र त्याच्या गावातील इतर मित्रांना ही गोष्ट सांगातो. हे मित्र सुलकी आणि तिच्या नवऱ्याला रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन गाठतात. सुलकीवर दहा बाराजण बलात्कार करतात. सुलकी बेशुद्ध होते. बेशुद्धअवस्थेत तिला दुसऱ्या गावी नेऊन देहविक्रय करण्याच्या धंद्यासाठी विकतात. सुलकी महिनाभर अतोनात छळाला समोरे जाते. पण धंद्यासाठी तयार होत नाही. शेवटी होणाऱ्या छळाला कंटाळून ती तयार होते.

सुलकीला उपभोगण्यासाठी पहिल्याच रात्री एक मुसलमान पुरूष येतो. तो अठवडाभराचे पैसे एकदम देऊन सुलकीसाठी येत राहतो. ''तो रात्रभर तिच्याजवळ बसायचा. तिच्या चेहऱ्यावरचे आश्रु टिपायचा. केसांवरून हात फिरवीत कुरवळायचा.''[२३] ह्या अनुभवाने सुलकी त्याच्या प्रेमात पडते. एके दिवशी दोघेही तेथून पळून जातात. तो लोहाराचे काम करून सुलकीला सुखात ठेवतो. सुलकीही त्याच्यासोबत सुखी राहते.

मेश्रामांनी या कथेत एका स्त्रीला कोणकोणते अन्याय सहन करावे लागतात याचे वर्णन केले आहे. हा अन्याय केवळ स्त्री असल्यामुळे सहन करावा लागतो. तसेच पुरूष हा स्वत:च्या अब्रुसाठी, स्वत:चे नपुंसकत्व लपवण्यासाठी किती खालच्या थराला जाऊ शकतो ह्याचे भेदक चित्रण केले आहे. समाजातील लोकही एखाद्या स्त्रीवर कशाप्रकारे अन्याय करतात हे स्पष्ट केले आहे. तर दुसरीकडे एका वेश्येला स्वत:च्या घरी नेऊन तिला पत्नीप्रमाणे वागवणारा पुरूष दाखविला आहे. मेश्रामांनी ह्या कथेतून पुरूषीपणाच्या वेगवेगळ्या प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे. स्त्रीच्या मनाची कुचंबना चित्रित केली आहे.

**कलावंत**

'कलावंत' ही कथा एका नाटककारावर आधारित आहे. कथेचा नायक हा एक नाटककार, अभिनेता आहे. या नायकाच्या अभिनयाला तोड नाही. तो नाटकात ज्याप्रमाणे अभिनय करतो, त्याचप्रमाणे वास्तव जीवन जगत असताना अभिनय करतो. स्टेजवर असताना एक आणि घरी असताना वेगळेच रूप धारण करणाऱ्या या कलावंताच्या दुहेरी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणारी ही कथा आहे.

कथेतला तो नाटकात काम करणारा अभिनेता आहे. 'तो'ला लहानपणापासून गर्दीचे वेड असते. आपले नाव व्हावे, वर्तमानपत्रातून आपले फोटो झळकावेत अशी त्याची इच्छा असते. अभिनय करताना त्याच्या सोबतीला ती नेहमी असते. "कधी ती त्याची बहीण असे. कधी घरधनीण, कधी शेजारीण, केव्हा देवता तर कधी बटीक बनत असे"[२४] ती लहान असताना तिच्या मामाला तिच्या आयुष्याची सगळी जबाबदारी घेण्याच्या बोलीवर तो तीला आणतो. तीला गायन आणि नृत्याचे धडे देतो. चार चौघात तो तीची ओळख करून देताना आपली बहीण म्हणून सांगतो. तो तीचा त्याला गरज पडेल तसा उपयोग करून घेतो. जगाला बहीण म्हणून ओळख करून देतो आणि एकांतात मात्र तीचा उपभोग घेतो. तो खूप प्रसिद्ध कलावंत असतो. अनेक लोक

त्याच्या अभिनयाचे वेडे असतात. आपल्या प्रसिद्धीला तडा जाऊ नये, आपली बदनामी होऊ नये म्हणून तो तीला लोकांपुढे भैया म्हणून हाक मारण्यास बजावतो. असा हा नाटककार दोन प्रकारचे अभिनय करत राहतो.

मेश्रामांनी या कथेतून कलावंताच्या दुहेरी व्यक्तिमत्वाचे चित्रण केले आहे. स्वत:ची अब्रू वाचवण्यासाठी नात्यांना काळीमा फासणाऱ्या कलावंताच्या खऱ्या रूपाचे दर्शन घडवले आहे. तसेच ती फक्त त्याच्यासाठी त्याच्या प्रत्येक गोष्टीला होकार देते. कारण 'ती'चे त्याच्यावर खूप प्रेम असते.

**खवडा**

'खवडा' ही कथा महाविद्यालयीन जीवन जगणाऱ्या मुलांच्या मैत्रीची कथा आहे. मेश्रामांची ही कथा या कथासंग्रहातील इतर कथांपेक्षा वेगळी आहे. या कथेत इतर कथांप्रमाणे कोणावर अन्याय, अत्याचार, बलात्कार झालेला नाही. जिद्दीनं शिक्षण घेणारे दोन मित्र एकमेकांच्या सानिध्यात राहून आपली प्रगती करू पाहतात.

नारायण दांगट हा खेडेगावात राहणारा मुलगा आहे. त्याचे खरे नाव बलभीम असते. पण शहरात कॉलेजमध्ये आल्यानंतर त्याचे नाव नारायण होते. ''एकटांगी धोतर, सिल्कचा तलम सदरा, त्यावर निळ्या रंगाचा कोट, केसाला पेहेलवान कट असा बलभीम आपले करकरणारे बूट वाजवीत वर्गात शिरला की, दोन मिनिटे सगळ्यांचे लक्ष वेधून घ्यायचा.''[२५] शहरातील मुलांच्या बायकीपणाचा त्याला राग येतो. बलभीम कॉलेजच्या पहिल्याच दिवशी पांडुरंग पाटीलच्या शेजारी जाऊन बसतो आणि त्यांची ओळख होते. या ओळखीतून त्यांची घनिष्ट मैत्री होते. पुढे-पुढे तर त्या दोघांची मैत्री संपूर्ण कॉलेजवर प्रसिद्ध होते. बलभीम पांडुच्या घरी नेहमी जात असतो. पांडुच्या घरचेही बलभीमला चांगल्याप्रकारे ओळखू लागतात.

बलभीम हळूहळू बदलू लागतो. धोतर ऐवजी तो पॅन्ट घालू लागतो. पण शहरातील मुलांचा बायकीपणा आपल्यात येऊ देत नाही. परीक्षा जवळ येते सगळे

अभ्यासाला लागतात. बलभीम काही अभ्यास करत नाही. वेलनकर सरांनी विद्यार्थ्यांना पेपरमध्ये काहीतरी लिहिण्याच्या युक्त्या सांगितल्या असतात. तेव्हा बलभीम संपूर्ण पेपर भरून नारायण, नारायण असे लिहितो. वेलनकर सर त्याचा पेपर सगळ्या वर्गाला दाखवतात. तेंव्हापासून बलभीम दांगटचा नारायण होतो. मुले त्याला नारायण म्हणूनच बोलवू लागतात. पण पुढच्या परीक्षेचा अभ्यास नारायण जोमाने करतो. अभ्यास बुडू नये म्हणून तो स्वत:च्या घरीदेखील जाण्याचे टाळतो. परीक्षा संपते आणि तो आपल्या घरी जातो. घरी जाण्याच्या गडबडीत नारायण अंडरवेअर मधून लोंबणारे लंगोट्याचे टोक हालवत चहा-पावडर आणायला जातो आणि स्वत:चा हशा करून घेतो.

**समर्पण**

'समर्पण' ही कथा चंदीगडच्या राजघराण्यातील राजकुमारीच्या समर्पणाची आहे. राजकुमारी आपल्या लग्नाची स्वप्ने पाहते. ज्याच्याशी लग्न करण्याची स्वप्न पाहते त्याचाच ती खून करते. तेव्हा तिला कोणत्याही प्रकारचा पश्चाताप होत नाही.

चंदीगडचा राजा समरशिंग आहे. तो एक चांगला योद्धा आहे. त्याचे राज्य अजिंक्य राहते ते त्याच्या लढवय्येपणामुळे. समरसिंगला विनयवती नावाची एक मुलगी आणि शक्तिसिंग नावाचा मुलगा असतो. राजा समरसिंग आपली मुलगी विनयवतीचा विवाह करण्याचे ठरवतो. युद्ध नैपुण्याची परीक्षा सलग तीन वर्षे जिंकणाऱ्या युवकाशी विनयवतीचे लग्न लावण्याची दवंडी पिटतो. राणा अमरसिंग नावाचा युवक सलग दोन वर्षे ती परीक्षा पूर्ण करून त्यामध्ये जिंकतो. तेव्हा विनयवती त्याच्या प्रेमात पडते. तिसऱ्या वर्षी ती आतुरतेने त्याची वाट पाहते.

दुर्गापूजेचा, चंडिकापूजेचा तो दिवस उगवतो. विनयवती खूप खुशीत असते. युद्ध परीक्षेला सुरवात होते. विनयवती अमरसिंगची आतुरतेने वाट पाहते. पण त्यावेळी यवनप्रमुख सफाऊल्लाखान समरसिंगला बंदी करतो. विनयवतीवर बलात्कार करतो. तेवढ्यात अमरसिंग येतो आणि सफाऊल्लाखानचे मुंडके उडवतो. विनयवतीला

आपल्या जवळ घेतो. विनयवती शुद्धीवर येते आणि अग्नित उडी मारू लागते. तेव्हा अमरसिंग तीला बाजूला ढकलतो. त्याच क्षणी विनयवती अमरसिंगच्या छातीत खंजीर मारते, आणि म्हणते, "आपल्या पोटी राजपुत्रांची भ्रष्ट अवलाद जन्माला येऊ नये म्हणूनच मी हे केले स्वामी! अतिशय प्रेमापायी... केवळ तुमच्यासाठी!"[२६] विनयवतीला अमरसिंगने सफाऊल्लाखानला पाठवल्याचा संशय येतो. म्हणून ती त्याला मारते.

केशव मेश्रामांनी प्रस्तुत कथेतून प्रेम आणि क्रोधाचे चित्रण केले आहे. विनयवती अमरसिंहवर खूप प्रेम करते. त्याच्याशी ती विवाहाची स्वप्न रंगवते. पण त्याच वेळी अमरसिंहवर संशय घेऊन क्रोधित होऊन त्याचा खून करते.

अशाप्रकारे 'धगाडा' या कथासंग्रहातील कथांचे विषय हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. या कथासंग्रहातील कथांचा आशय हा वेगवेगळ्या स्वरूपाचा असल्याचे दिसून येते. या कथासंग्रहातील कथांमध्ये आपल्या निर्दोष मुलीसाठी आक्रोश करणारा बाप आहे, चोऱ्या करणारी मुले, अन्नासाठी काम करताना जीव जाणारी, मृत्यूला सामोरे जाणारी माणसे आहेत. काही कथांमध्ये निर्दोष स्त्रियांना बलात्काराचा बळी ठरावे लागले आहे. काही कथा पांढरपेशा समाजातील लोकांचा व्याभिचारीपणा उघडा पाडणाऱ्या आहेत. या कथासंग्रहातील कथा त्या त्या कथेच्या आशयामुळे स्वत:चे वेगळेपण स्पष्ट करतात.

**'चिखलचोथा'**

चिखलचोथा या कथासंग्रहामध्ये एकूण आठ कथा आहेत. या कथा मुंबईतील झोपडपट्टीत आपले जीवन जगू पाहणाऱ्या लोकांच्या आहेत. काही कथा या दुबळ्यांवर होणाऱ्या अन्यायाच्या, अन्यायाला विरोध करणाऱ्यांच्या आहेत. प्राध्यापक पेशात असणाऱ्या व्यक्तींच्या रंगेलपणा स्पष्ट करणाऱ्या कथा, जबरदस्ती वेश्या व्यवसायाला बळी पडलेल्या स्त्रियांच्या कथा आहेत. या सर्व कथांचा आशय पाहू.

**शोष :**

प्रस्तुत कथा ही शीर्षकाला समर्पक अशीच आहे. या कथेमधील नायक हा शोषित आहे. अनेक प्रकारे त्याचे शोषण झालेले आहे. संपूर्ण जीवनाचा शोष या कथेमध्ये चित्रित करण्यात आला आहे.

बल्लू हा या कथेचा नायक आहे. बल्लूचा शोष लहानपणापासूनच सुरू झाला. बल्लू मुळचा बीडचा. बीडमध्ये त्याचा जन्म झाला. बल्लू लहानपणापासून कामं करतो. लहानपणी तो आईबाबासोबत दुष्काळी कामावर जातो. एके दिवशी कामानिमित्त गाव सोडून मुंबईत येतो आणि मुंबईचाच होऊन बसतो. बल्लू मुंबईत मिळेल ते काम करतो. त्याला घराकडे जाण्याची इच्छा होत असते पण घराकडे जाण्याइतपत पैसेदेखिल त्याला मिळत नसतात. अशाप्रकारे बल्लू आपल्या आईवडील, नातेवाईकांना पूर्णपणे विसरून मुंबईच्या झोपडपट्टीत आपले जीवन व्यथित करतो.

बल्लूचे खरे नाव बळीराम असते पण त्याला कधी कोणी बळीराम म्हणत नाही. ''कोणाला धाकरूबाब वाटावा, असा तो कधी भरलाच नव्हता. पाच फूट उंची, छाती जेमतेम तीस इंचाची, धारदार नाक, नाही म्हणायला दाढी ठेवली होती. हड्डीफसली एक.''[२७] अशा शारिरीक ठेवणीमुळे बल्लूला सर्वजण 'बल्लू सुक्कट' असे म्हणायचे. बल्लू शरीराने अत्यंत अशक्त असल्यामुळे त्याला शारिरीक कष्टाची कामे होत नाहीत. त्यामुळे बल्लू पेपर टाकणे, गाड्या पुसणे, घरगडी म्हणून कामे करतो.

बल्लूचा स्वभाव अत्यंत भित्रट आहे. ''कोणी आवाज चढवला की तो गोरामोरा व्हायचा. हात उगारला की तासभर कलेजा धाकाने फडफडत राह्यचा.''[२८] बल्लूचा स्वभावच त्याच्या शोषाचे कारण ठरला होता. बल्लू मानखूर्दच्या खापरपट्टीमध्ये राहतो. त्या परिसरात पक्यादादाची वट असते. बल्लूला पक्यादादा त्याच्या झोपडीशेजारी नवीन झोपडी मारून देतो. पक्यादादाने बल्लूला दारूच्या ट्यूबा पोहचवण्याच्या कामावर ठेवले होते. दारूच्या ट्यूबा पोहचवणे हे काम अतिशय धाडसाचे आणि जोखमीचे

होते. पण पक्यादादाच्या भितीमुळे बल्लूसारखा भित्रा माणूस ते काम नाईलाजाने करत होता. बल्लूला ते काम करणे पसंत नव्हते पण पक्यादादाला नकार दिला तर बल्लूला मार खावून बेघर व्हावे लागले असते. या विचाराने बल्लू निमूटपणे ते काम करतो. पक्यादादा बल्लूच्या भित्र्या स्वभावाचा फायदा उठवून त्याचे शोषण करत होता. एकेदिवशी बल्लू दारू पोचवताना पोलीसांना सापडतो. दोन दिवस पोलीस चौकीत आणि सुटका झाल्यानंतर पक्यादादाकडून बेदम चोप बल्लूला खावा लागतो.

बल्लू दवाखान्यात जातो. पण त्याचवेळी डॉक्टर बल्लूला टी.बी. असल्याचे सांगतो. बल्लू जास्तच हादरून जातो. तो आपली बायको चंपीलादेखील ही गोष्ट सांगत नाही. त्यातच बल्लूला मुलगा होतो. मुलगाही अशक्त जन्मतो. कसेबसे बल्लू त्याला जगवतो. पण मुलगा आनंद जन्मल्यानंतर काही दिवसातच त्याची बायको चंपा पायाला काहीतरी कापल्याच्या निमित्ताने अतिरक्तस्त्राव होऊन मरते. बल्लू आपल्या मुलाचा आनंदाचा आईप्रमाणे सांभाळ करतो. त्याला वाढवतो.

एके दिवशी पक्यादादा पोलीसांकडून मारला जातो. पक्यादादा मेल्यामुळे बल्लूवरचा दबाव कमी होतो. बल्लू पुन्हा आपला पूर्वीचा कागद, डबे, बाटल्या, भंगार गोळा करण्याचा धंदा करू लागतो. पक्यादादा मेल्यापासून त्याची बायको नैनाचे बल्लूच्या घरी येणे-जाणे चालू असते. एकेदिवशी तिच्यावर दया दाखवून बल्लू तिच्याशी लग्न करतो. नैनासोबत तीची मुलगी जायूही बल्लूच्या घरी राहू लागते. पण त्या दिवसापासून त्याचा मुलगा आनंद कायमचाच घर सोडून कामतशेठच्या हॉटेलवर कामासाठी जातो. पण तो आपल्या बापासाठी दर आठवड्याला मालकाकरवी पन्नास रूपये पाठवत राहतो. थोडी आपली कमाई आणि आपल्या मुलाचे पैसे यावर बल्लू आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतो.

या कथेतून मेश्रामांनी बल्लू सारख्या भित्र्या स्वाभावाच्या व्यक्तीचे लहानपणापासून ते वयाच्या ४०-४५ त्र्यापर्यंतचे शोषण वर्णिले आहे. त्यामध्ये त्याचे दुष्काळाच्या कामावर झालेले, दारूच्या ट्यूबा पोहचवताना झालेले शोषण, तसेच

बल्लूला सुक्कट म्हणून चिडवणे, त्याला भिती दाखवणे, त्याचे घाबरून जीवन जगणे यातून झालेले मानसिक शोषण या कथेत चित्रित करण्यात आले आहे. तेव्हा गीता मांजरेकर यांचे "मेश्रामांच्या कथेतील माणसे पांढरपेशी नाहीत. ती सगळी विविध प्रकारे पोट भरून आपला जीव जगवणारी शोषित माणसे आहेत."[२९] हे म्हणणे सिद्ध होते. मेश्रामांच्या बऱ्याच कथांमधून बल्लूप्रमाणे अनेक व्यक्ती इतरांच्या शोषणाला बळी पडल्याचे दिसून येते.

**गरगर फिरकी**

प्रस्तुत कथा ही एका टॅक्सी ड्रायव्हरच्या जीवनाची फिरकी घेणारी कथा आहे. मुंबईमध्ये अनेक बेरोजगार तरूण आपले नशीब आजमावण्यासाठी येत असतात. त्यातीलच एक परताप सरतापे हा या मुंबईत येतो आणि आपले जीवन जगू पाहतो. हे जीवन जगत असताना त्याला कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते याचे चित्रण या कथेमध्ये करण्यात आले आहे.

परताप सरतापे हा तरूण मूळचा कर्नाटकातील गुलबर्ग्याचा. परतापचे आई-वडील गुलबर्ग्यात वेठबिगार म्हणून काम करतात. परतापही त्यांच्यासोबत काम करत असतो. पण एके दिवशी ते काम सोडून तो कोणालाही न सांगता एका ट्रक ड्रायव्हरसोबत मुंबईत येतो. काही दिवस त्याच्यासोबत काम करतो. पण काही दिवसातच तो ट्रक ड्रायव्हर परतापला हाकलून लावतो. परताप एका सरदारजीच्या गॅरजेमध्ये काम मिळवतो. सरदार गॅरेजमध्ये चोरीच्या गाड्यांची रंगरंगोटी करून त्या विकण्याचे काम चालत असते. परतापला हे काम पसंत नसताना तो नाइलाजास्तव ते करतो. सरदार त्याला कामाचे पैसे देत नाही. एकदा तो सरदारला धाडस करून पैशाबाबत विचारणा करतो. तेव्हा सरदार "गॅरेज में सोता रे भाडखाऊ. भरपेट खाता, काम का कपडा, चायपानी-सिग्रेट, पैसा कैसा निकलेंगा, हुश्शारी करता है। फूट भेन्चोद!"[३०] अशा शिव्या देऊन परतापला गॅरेजमधून हाकलून देतो. बेरोजगार परताप सरतापे असगर नावाच्या गुंडाची टॅक्सी रात्रपाळीला फिरवण्याचे ठरवतो. "पण असगर

रेडलाईट एरिया, अंडरवर्ल्ड, अफिन अड्डे, तसल्ली क्लब, अंदरबाहर, पावभट्टी या सगळ्या ठिकाणी इतका फिट्ट बसला होता की त्याचे डझनवारी लोक चौफेर असायचे. पैसे घेणारे एस.आय. आणि हवालदारच त्याला बातमी द्यायचे.''[३१] अशा असगरची टॅक्सी एकदा परतापकडून ठोकरली जाते. तेव्हा असगर सक्तीने त्याच्याकडून दोन वर्षे काम करवून घेतो. त्याला जनावराप्रमाणे राबवतो. परतपाच्या मनात तेथून पळून जाण्याचे विचार अनेकदा येतात पण असगरसारख्या माणसापासून पळून जाऊन मुंबईत राहणे महाकठीण काम होते.

परताप बन्नेबाबू नावाच्या एका व्यक्तीस गाडीखाली जाण्यापासून वाचवतो. त्या दोघांची चांगली मैत्री होते. बन्नेबाबू परतापची राहण्याची सोय त्याच्याकडे करतो. असगरचे कर्ज फेडतो आणि परतापला त्याच्यापासून वाचवतो. तसेच शामलाल नावाच्या एका लीडरची परतापसोबत ओळख करून देतो. शामलाल तरूण क्रांती पार्टी नावाच्या संघटनेचा संघटक असतो. संप घडवून आणणे, संप फोडणे अशी कामे तो करत असतो. ''दुकानदार, टपरीवाले, पानवाले, झोपडीवाले, गुंड, जुगार अड्डे, कॅब्रे क्लब यापैकी कुणाचीही भानगड झाली की 'शौकत मंझिल' च्या तळमजल्यावर हजेरी लागायचीच.''[३२] अशा या शामलालसोबत परताप राहू लागतो.

एके दिवशी शामलाल परतापला सरदारकडून त्याने काम केल्याचे पाच हजार रूपये वसूल करून देतो. तसेच असगरकडून वीस हजार रूपये परतापला मिळवून देतो. परतापला बँकेचे कर्ज देवून स्वतःच टॅक्सी घेऊन देतो. शामलाल स्वतः कुठे जायचे असेल तर परतापची टॅक्सी भाड्याने नेतो. परताप शामलालचा खासगी ड्रायव्हर म्हणून वावरतो. परताप शामलाल सोबत कामाठीपुऱ्याच्या वेश्या वस्तीत जातो. तेथील स्त्रिया पाहून त्याला त्याच्या आई आणि बहिणीची आठवण यायची. परतापला सगळे छंद असतात. पण त्याने कधी बायीचा छंद जोपासला नाही. ''टॅक्सी ड्रायव्हर परताप सरतापे वेश्यांकडे जाण्याची संधी असूनही तिथे जात नाही.''[३३] कारण तो एक

चांगल्या विचाराचा तरूण होता. शामलालला वेश्यांकडे जाण्याचा छंद होता. पण परतापला हे त्याचे वागणे पसंत नव्हते. एकदा असेच शामलाल सोबत तो एका वेश्या अड्ड्यावर जातो आणि त्याला धक्काच बसतो. कारण त्याला तिथे लहानपणी हरवलेली त्याची बहीण पारू दिसते. परतापच्या पायाखालची जमीन सरकते. परताप पूर्णपणे हादरून जातो.

मेश्रामांनी या कथेत परताप सरतापेचे जीवन कशाप्रकारे फिरकी घेते याचे चित्रण केले आहे. कष्ट करून परतापचे जीवन क्षणार्धात कसे उध्वस्त होते त्याचे चित्रण अगदी मनाला चटका लावणारे आहे. नियती मानवी जीवनाची कशाप्रकारे फिरकी घेते हेच या कथेतून पहायला मिळते.

**कुरघोडी :**

जगामध्ये अनेक प्रकारच्या व्यक्ती असतात, म्हणजे व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आपल्याला पहावयास मिळतात. अशाच काही व्यक्ती आणि प्रवृत्तीचे चित्रण मेश्रामांनी कुरघोडी या कथेमध्ये केलेले आहे.

मेश्रामांच्या कथेमध्ये जास्त करून मुंबईतील झोपडपट्ट्यांचा परिसर आणि त्यामध्ये राहणारी गरीब माणसे आढळून येतात. या मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये भारताच्या काना-कोपऱ्यातून अनेक व्यवसाय करणारी माणसे मेश्रामांच्या कथेचे नायक बनले आहेत. 'कुरघोडी' या कथेतील जगवंता यादव हा तरूण मुंबईतील धोबी घाटावर काम करतो. "चाळीस जत्थे काम करू शकतील एवढा विराट पसारा या धोबीघाटाचा होता. काही सोळा टाक्यांचे, काही वीस टाक्यांचे, तर काही चोवीस टाक्यांचे, सलग सिमेंटचे भक्कम हौद, त्यात बांधलेले होते."[३४] त्या टाक्यांवर नऊ-दहा किंवा चौदा-पंधरा मजूरांचा जत्था काम करत असायचा. या प्रत्येक जत्थ्याचा एक जत्थेदार होता. तो प्रत्येकाकडून काम करून घ्यायचा. अशा एका जत्थ्यावर जगवंता कामाला लागतो.

जगवंता मूळचा बिहारचा. मुंबईत कामासाठी येतो. मुंबईत तो सहा महिने गल्ली बोळात फिरून तेल विकणे, दूध विकणे, तबेल्यातील सफाई करणे, पानाच्या दुकानात अशी अनेक प्रकारची कामे करतो. शेवटी त्याला धोबी घाटावर कपडे धुण्याचे काम पसंत पडते. तेथेच तो काम करू लागतो. सुकबीर नावाचा सहा फूट उंचीचा, तगडा इसम त्याचा जत्थेदार असतो. जगवंता उंचीने पाच फूट, किरकोळ देहयष्टीचा आहे. गाल, डोळे आत गेलेले. अतिशय भोळ्या स्वभावाचा आहे. कोणीही त्याच्या भोळ्या स्वभावामुळे त्याची टर उडवतात. त्याला फसवतात. एकदा त्याच्या बिरजू नावाच्या मित्राला लॉटरीच्या तिकिटावर पन्नास रूपयाचे बक्षीस लागते. हे पाहून जगवंता एका लॉटरीवाल्याकडून पन्नास रूपये देऊन तिकिटे घेतो. पण लॉटरीवाला जगवंताने फक्त पाचच रूपये दिले असा बनाव करतो. लॉटरी घेणारी इतर लोकही लॉटरीवाल्याच्या बाजूने बोलतात. जगवंता एकाकी पडतो. जगवंताचे पन्नास रूपये आणि लॉटरीची तिकीटेही जातात. तेव्हापासून तो कधी लॉटरीच्या नादाला लागत नाही.

जगवंताच्या लॉटरीच्या प्रसंगावरून जत्थेदार सुखबीर आणि धोबीघाटावरचे इतर धोबी त्याची मस्करी करतात. तेव्हापासून त्याला 'लखपती जगवंता' म्हणून सर्वजण हिणवतात. जगवंता तर त्या धोबीघाटावर सगळ्यांच्या टवाळीची आणि खदखदून हसण्याी वस्तू बनला होता.''[३५] जगवंता खूप खजिल होतो. आपल्या ठेकेदाराला धोबीघाटावरील जुन्या, अनुभवी लोकांना सुखबीरला आपली मस्करी न करण्यास सांगण्यासाठी प्रवृत्त करतो. पण सुखबीर काही केल्या ऐकत नाही. सुखबीर नेहमी जगवंताची टर उडवण्याच्या संधीच्याच शोधात असतो.

जगवंता खूप ठरवत असतो की आपण असे कोणतेच काम करायचे नाही की ज्यामुळे आपली टर उडवली जाईल. पण त्याच्या भोळसट स्वभावामुळे तो असे काही करून बसे की त्याची मस्करी होई. एकदा तो सुखबीर सोबत वेश्यागमनासाठी वेश्या वस्तीत जातो. एका वेश्येला पैसे देतो आणि घाबरून बाहेर येतो. सुखबीरला पुन्हा

त्याची टर उडवण्याची संधी मिळते. तो जगवंताला म्हणतो, "अरे बिना बैठेही आया क्या पहलवान। कुछ ये आठमें कम तो नहीं!"[३६] या घटनेनंतर काही दिवसानंतर जगवंताला मुलगा झाल्याची बातमी त्याच्या गावाकडून येते. जगवंता सगळ्या धोबी घाटावर पेढे वाटतो. पेढे वाटतानाही सुखबीर त्याच्या पुरूषत्वावर शंका घेतो. "मेश्रामांच्या कथेतील माणसे शोषित असली तरी सोसतच रहायचं आणि संपायचं असं म्हणणारी ती दैववादी माणसे नाहीत. उलट, अन्यायाने चिडणारी, धुमसणारी आणि शेवटी अन्यायाविरूद्ध आपली जोरकस प्रतिक्रिया व्यक्त करणारी ही माणसे आहेत."[३७] हे गीता मांजरेकर यांचे म्हणणे खरे ठरते. जगवंता एके दिवशी सुखबीरला ॲसिडने भरलेल्या हौदात ढकलून देतो आणि आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या विरूद्ध बंड करून उठतो. भोळ्या स्वभावाचा जगवंता सुखबीरला ॲसिडमध्ये ढकलल्याचे कोणासही जाणवणार नाही याची काळजी घेऊन सुखबीरचा अपघात झाल्याचे भासवतो.

या कथेतून मेश्रामांनी एखाद्यावर विनाकारण अन्याय होत असेल तर ती व्यक्ती अन्याया विरूद्ध कशी बंड करते हे दाखवून दिले आहे. शरीराने किरकोळ असणारी व्यक्तीही आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला कशाप्रकारे घेते याचे एक उदाहरण जगवंताच्या रूपाने दिलेले आहे.

**रंध्रांची गोष्ट**

'रंध्रांची गोष्ट' ही कथा मुंबईतील एका कॉलेजमध्ये शिकवणाऱ्या प्राध्यापकाची आहे. हा प्राध्यापक विवाहित असताना एका विद्यार्थीनीच्या प्रेमात कशाप्रकारे गुरफटत जातो, तिच्याशी लग्न करतो आणि हे लग्न त्याच्या जीवनात कसे वादळ निर्माण करते याचे चित्रण या कथेत करण्यात आले आहे.

केशव मेश्रामांनी कथेच्या नायकाला नाव दिलेले नाही. मेश्राम या कथानायकाचा उल्लेख 'तो' असा करतात. तो एक प्राध्यापक आहे. प्राध्यापकाचे काम असते विद्यार्थ्यांना चांगल्या गोष्टी शिकवणे, त्यांना वाईट गोष्टींपासून परावृत्त करणे,



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वेळप्रसंगी उपदेशाचे डोस पाजणे. तो ही तेच करत होता. पण त्याच्या या वागण्यानेच मंदा टिपणीस नावाची त्याची एक विद्यार्थीनी त्याच्या प्रेमात पडते. पण तो तीला कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देत नाही. कारण तो एक प्राध्यापक असतो, आणि ती त्याची विद्यार्थीनी. तो ला आपल्या विद्यार्थीनीसोबत प्रेम करणं मान्य होत नाही. तो तीला खूप समजावून सांगतो. त्याचे लग्न झाल्याचे, त्याला मुले असल्याचे तिच्या निदर्शनास आणून देतो. तो तिच्याशी तुसडेपणाने वागतो, तिचा वारंवार अपमान करतो. पण मंदा त्याचे काहीही ऐकत नाही. "सर! तुमच्या घरी भांडी घाशीन, मोलकरीण म्हणून राहीन. तुम्हा सगळ्यांचे करीन. मला टाकू नका. झिडकारू नका. तुम्हाला लांबून बघेन."[३८] असे बोलून ती त्याला नेहमीच निरूत्तर करते.

तो मंदापेक्षा अठरा वर्षांनी मोठा आहे. तो नेहमी मंदाला दोघांच्या वयातील अंतराबद्दल जाणीव करून देतो. तो ने नसबंदी करून घेतल्याचेही ती ला सांगतो. "सर! दोन्ही माणसं निर्दोष असूनही कधी कधी मुलं बाळं नाहीत होत. मला फक्त तुम्ही हवे आहात, जसे आहात तस्से."[३९] अशा गोष्टी करून ती नेहमी तो ला तिचा विचार करण्यास भाग पाडते. शेवटी तो मंदाच्या प्रेमात गुरफटला जातो. दोघेही विना लग्नाचे एकत्रित राहू लागतात. हळूहळू सगळ्या समाजात ही बातमी पसरते. तो च्या कॉलेजवरही वादळ उठते. कॉलेजमधील मुले मंदा आणि तो च्या प्रेमसंबंधाचे सचित्र प्रदर्शन कॉलेजच्या मुतारीमध्ये मांडले जाते. मंदाही प्राध्यापिका होते. तिच्याही कॉलेजमध्ये हीच परिस्थिती असते. अशा या त्रासामुळे तो पूर्णपणे वैतागून जातो.

मंदासोबतचे तो चे प्रेमसंबंध तो च्या बायकोला समजल्यापासून ती तोशी बोलणे बंद करते. एका घरात राहत असून ती तो शी चिठ्ठी लिहून आपली मते कळवते. मंदा प्रकरणामुळे तो आपल्या पत्नीपासून दूर होण्याचे ठरवतो. पत्नीही घटस्फोट घ्यायला तयार होते. पण ज्या मंदासाठी तो आपल्या बायको–पोरांना सोडायला तयार होतो ती मंदा त्याला टाळाटाळ करू लागते. तो एकाकी पडतो. "लुतभरल्या कुत्र्यासारखे आपले एकटेपण त्याला आचके देताना दिसत होते."[४०] तो

मानसिक त्रासाने ग्रासला जातो. तो ने माहीम आणि कल्याणच्या घरासाठी आपले सर्व पैसे लावलेले असतात. तेव्हा तो पैशाकडूनही रिकामा होतो.

तो पैसे कमवण्यासाठी श्रीकृष्ण प्रकाशनाच्या गाईड निर्मितीचे काम करू लागतो. मालाबाई गायतोंडे या त्या प्रकाशनाच्या प्रकाशिका असतात. मालाबाई तो आणि मंदाच्या संबंधाची सर्व माहिती मिळवते. मालाबाईला आपल्या नवऱ्याकडून सुख मिळत नसते म्हणून ती तो शी लगट करते. तो ही तिच्या प्रेमाला बळी पडतो. गायतोंडे आपला स्वार्थ साधून घेते.

या कथेतील नायक तो हा मेश्रामांच्या इतर कथांतील नायकांपेक्षा वेगळा आहे. तो एक पांढरपेशी समाजातील प्राध्यापक ब्लॉकमध्ये राहणारा आहे. तो नकळत विवाहबाह्य संबंधात खेचला जातो. पण आपली चूक त्याला मंजूर नाही. "स्त्रिया, विवाह झालेल्याही स्वत:च्या सुखासाठी, सुरक्षिततेसाठी व महत्त्वकांक्षेसाठी आपल्याला नादी लावतात. व स्वत:चा स्वार्थ साधला की, सरळ सोडून टाकतात."[४१] असे तो वाटते. मेश्रामांनी येथे तो च्या जीवनात आलेल्या स्त्रिया आणि तो चे त्यांच्याकडे खेचले जाणे याचे चित्रण केले आहे. तो कशाप्रकारे स्त्रियांच्या नादी लागतो आणि स्वत:ची मानसिकता स्वत:च बिघडवून घेतो यावर प्रकाश टाकला आहे.

**वारूळ**

'वारूळ' ही कथा पारू आणि जाई या दोघी बहिणी आणि त्यांची आत्या नयना या तीन स्त्रियांच्या जीवनाची करूण कहाणी आहे. नयनाला परिस्थितीमुळे वेश्या व्यवसाय करावा लागतो. पण ती आपल्या भाच्यांना त्याच्यापासून दूर ठेवते. एकाकी स्त्रीचा पुरूष मंडळी कशाप्रकारे उपभोग घेतात यावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे.

नयना नगर जिल्ह्यातील एका खेडेगावात आपल्या लखवा मारलेल्या भावासोबत राहते. तिच्या भावाला पारू आणि जाई नावाच्या दोन मुली असतात. नयनाचे लग्नाचे वय निघून जात होते तरी तिचे लग्न होत नाही. तिच्या गावातील नागनाथ तिच्याशी

जवळीक साधतो. नयनाही त्याच्यावर जीवापाड प्रेम करते. नागनाथ एके दिवशी नयनाला मुंबईला घेऊन जातो. नयनाचे आपल्या दोन्ही भाच्यांवर खूप प्रेम असते. या प्रेमापोटी ती त्या दोघींना आपल्या सोबत घेते. नागनाथ मुंबईत आपल्या मामाकडे जातो. पण त्याच्या मामाची नोकरी गेलेली असते. मामाच बेघर झालेला असतो. नागनाथ आणि नयना मुंबईत अनेक ठिकाणी राहण्यासाठी जागा शोधतात पण जागा मिळत नाही. एका भंगारवाल्याच्या छोट्याशा कोपऱ्यात ते दहा रूपये देऊन झोपण्याची व्यवस्था करतात. त्याच रात्री वासनेने बरबटलेला नागनाथ नयनावर आपला हक्क गाजवतो.

नागनाथ आठ दिवस नयनाचा उपभोग घेतो आणि तीला सोडून देतो. नयना आपले व आपल्या भाच्यांचे पोट भरण्यासाठी अनेकांकडे कामाची मागणी करते. पण "यादव डेरीवाला, म्हेता अमदाबादी आणि मोडकळीला आलेल्या चाळीचे भाडे जमा करणारा पटेल यांनी आठ-आठ, दहा-दहा दिवस नयनाला भरपूर उपभोगून आधार दिला होता."[४१] नयना आपल्या भाच्यांसाठी या सगळ्यांचा अन्याय सहन करते. एके दिवशी पटेल, नयना आणि तिच्या भाच्यांना गुलसुमबाईच्या कोठ्यावर नेऊन विकतो. नयना आणि दोघी भाच्यांना गुलसुमबाई वेश्या व्यवसायासाठी जबरदस्ती करते. पण त्या तिघीही तयार होत नाहीत. दोन-तीन दिवस त्या दंगा करतात. शेवटी आपल्या भाच्यांना सोडण्याच्या मोबदल्यात नयना वेश्या व्यवसाय करण्यास तयार होते.

गुलसुमबाई पारू आणि जाईची व्यवस्था एका झोपडीमध्ये करते. दोघी बहीणी आपल्या आत्यापासून दूर होतात. झोपडीमध्ये त्यांना लागणारे सर्व साहित्य गुलसुमबाई घेऊन देते. रोज दोन वेळ त्यांना हॉटेलातून जेवणाचा डबा पोचवला जातो. झोपडीपासून जवळच असणाऱ्या कोंडाळ्यात त्या दोघी नारळाच्या करवंट्या गोळा करायला जातात. त्या गोळा करण्यात त्यांचा बराचसा वेळ निघून जातो. नारळाच्या करवंट्या गोळा करता करता त्या बाटल्या, बुचे, कागद, प्लास्टिक वेचून ते विकतात. सुरवातीला घाबरत घाबरत दिवस काढतात. हळूहळू त्यांना तेथे राहण्याची सवय होते.

एके दिवशी पारू आणि जाईला डबे पोचवणारा मुजाहिद इप्पर नावाच्या दारूड्याला त्यांच्या झोपडीत आणूण सोडतो. इप्पर दारूच्या नशेत झोपडीत पडून राहतो. दोघी बहिणी ती रात्र जागून काढतात. तेव्हापासून इप्पर आठवड्यातून दोन-तीन दिवस त्यांच्या झोपडीत रात्र काढण्यासाठी जातो. जाताना पारू आणि जाईसाठी अनेक वस्तू घेऊन जातो. दोघी बहिणी इप्परला आपला भाऊ समजातात. त्याला इप्परभाई म्हणून बोलावतात. पण एके दिवशी रात्रीचे इप्पर पारूवर बलात्कार करतो. इप्पर ड्रायव्हर पुन्हा एकदा झोपडीत येऊन पारूचा उपभोग घेतो.

वारूळ या कथेत मेश्रामांनी स्त्रिया पुरूषी वासनेला कशाप्रकारे बळी पडतात याचे वास्तव चित्रण केले आहे. "परस्परांना सांभाळून परिस्थितीतून मार्ग काढू पाहणाऱ्या बहिणी 'वारूळ' या कथेत आहेत."[४३] तसेच आपल्या भाच्यांवर जीवापाड प्रेम करणारी आत्या त्यांना वाचवण्यासाठी वेश्या व्यवसायास तयार होते. पण शेवटी व्हायचे तेच होऊन जाते. मेश्रामांच्या कथेतील स्त्रिया या स्वत:चे चारित्र्य सांभाळणाऱ्या आहेत. पण परिस्थितीने त्यांच्यावर घाला घातल्याचे दिसून येते.

**उंच उभी माती**

'उंच उभी माती' ही कथा आजी आणि नातवाच्या दु:खी जीवनाची आहे. आपला मुलगा, सून यांच्या मृत्यूनंतर आपल्या नातवासाठी झुलीबाई कष्ट करते. नातू वनवासला कष्टातून मोठा करते, त्याच्या लग्नची स्वप्ने पाहते. पण तिचे ते स्वप्न पूर्ण होत नाही. पुन्हा तिच्या वाट्याला दु:ख येते.

झुलीबाई सोलापूरात राहते. तीला तीन मुली आणि एक मुलगा असतो. म्हातारी चारी मुलांची लग्न लावून देते. "तिच्या मुली त्यांच्या त्यांच्या घरात सुखाने नांदत होत्या. एक बेळगावकडे, एक उस्मानाबाद, तिसरी निलंग्याला. मुलगा जीवलाल, सून भागी आणि त्याचीही वसुधा पोटुशी होती. दहा वर्षाचा हणमंता हा छोटा नातून तर फार गुणी आणि देखणा होता."[४४] असा झुलीबाईचा सर्व परिवार आपआपल्या घरी

सुखा-समाधानाने राहत होता. झुलीबाईच्या या परिवाराला दृष्ट लागते. शेजाऱ्याच्या मुलीच्या लग्नाला झुलीबाईचा मुलगा, सून, नातू आणि नात तुळजारला जात असताना अपघातात मृत्यूमुखी पडतात. त्यांचा मधला मुलगा वनवास पाय सुजल्याने झुलीबाईसोबत घरी राहिल्यामुळे अपघातातून बचावतो.

झुलीबाई आपला नातू वनवाससोबत आपल्या घरी राहू लागते. तिच्या तिन्ही मुली तिला आपल्या घरी येऊन राहण्याचा आग्रह करतात. पण झुलीबाईला माहिती असते की मुलींच्या घरी राहिल्याने जीवनाचे कसे हाल होतात. आपले आणि आपल्या नातवाचे जीवन सुखात घालवण्यासाठी स्वत:च्या घरी राहणे पसंत करते. पाच-सात वर्षे कष्ट करून ती नातवाचा सांभाळ करते. वनवासला शाळेत घालते. पण लिहिण्या वाचण्यापुरती शाळा तो शिकतो. शोलापूरात म्हातारीला वारंवार आपल्या मुलाची, सूनेची, नातवांची आठवण येते. झुलीबाई सोलापूरातील घर सोडून मुंबईला जाण्याचे ठरवते. मुंबईत आपल्या नातवाची काहीतरी प्रगती होईल असे तिला वाटत असते. एके दिवशी झुलीबाई आपले घर विकून, कर्ज फेडून उरलेले पैसे घेऊन मुंबईत जाते. सोलापूरातील घराच्या बदल्यात किकाभाई नावाचा आडत्या तिला मुंबईतील कांजूरमार्ग जवळच्या एका झोपडपट्टीत झोपडी घेऊन देतो.

झोपडपट्टीत वनवास आणि झुलीबाई राहण्यासाठी येतात. दोन-चार दिवसात वनवास रेल्वे स्टेशनच्या बांधकामावर कामाला जातो. वनवासला जो पगार मिळतो त्यात ती दोघं सुखाने राहतात. पण झुलीबाईला वाटत असते की आपल्या नातवाला चांगल्या मोठ्या पगाराची नोकरी लागावी. वनवासच्या कामासाठी झुलीबाई किकाभाई आडत्याला कानातील सोन्याची फुले देऊ करते. किकाभाई सोन्याच्या फुलांच्या बदल्यात वनवासला गोदीत कामाला लावतो. वनवास गोदीत हमालीच्या कामावर रूजू होतो. चांगली कमाई करू लागतो. झुलीबाई त्याच्या पगाराच्या पैशातून घरात नवनवीन वस्तू घेऊन ठेवते. कारण तिला वनवासच्या लग्नाचे वेध लागलेले असते. वनवासही

"आजीचे प्रेम, तिच्या खस्ता व त्याच्यासाठी चालवलेली स्वत:च्या जिंदगीची ओढाताण तो बघतच होता. त्यामुळे आजीला लागेल, खुपेल असा उणादुणा शब्द तो बोलायचा नाही."[४५] जेवायला बसला की आजीलाही सोबत घेऊनच जेवतो. अशा या गुणी नातवाला झुलीबाई एक मुलगी पसंत करून ठेवते. मुलीच्या घरच्यांना मुलगी पसंत असल्याचे कळवते.

वनवासला त्याच्या लग्नासाठी मुलगी पाहिल्याचे झुलीबाई सांगत नाही. ठराव पक्का झाल्यानंतरच वनवासला ती सांगणार असते. पण एके दिवशी वनवास गोदीमध्ये कामाला जातो तो कायमचाच. घोदीतील क्रेनचा हूक त्याच्या हातात घुसतो. वनवास पन्नास-साठ फूट वर उचलला जातो आणि जमीनीवर आपटतो. तेथेच त्याचा मृत्यू होतो.

मेश्राम यांच्या कथा मानवी नातेसंबंधाचे धागे उलगडणाऱ्या आहेत. "उंच उभी माती' मध्ये वनवास या आई-बापाचे छत्र हरपलेल्या नातवाला त्याची आजी कष्ट करून वाढवते आहे पण दुर्दैवाने वनवासचा अपघाती मृत्यू होतो."[४६] ही कथा देखील आजी आणि नातवाचे नातेसंबंध दर्शविणारी आहे. या कथेत मेश्रामांनी अपघातातून वाचलेल्या वनवासचा मृत्यू शेवटी अपघातातच होतो याचे हृदय पिळवटून टाकणारे चित्रण केले आहे. आजीचे नातवावर असणारे जीवापाड प्रेम चित्रित केले आहे.

**गिळी आपुला उगव**

'गिळी आपुला उगव' ही कथा मुंबईतील पारेखवाडीच्या चाळीमध्ये राहणाऱ्या माया आणि उमेश या बहिण भावाच्या जीवनावर आधारित आहे. यामध्ये मेश्रामांनी चाळीतील जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विश्वासातील माणसं कशाप्रकारे विश्वासघात करतात याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे ही कथा आहे.

पारेखवाडीच्या चाळ नंबर दोन मध्ये दिनकर निकुसे, त्याची पत्नी सुमित्रा, मुलगी माया आणि मुलगा उमेश राहतात. माया बारावीत तर उमेश दहावीत शिकतात.

दिनकर निकुसेचे वडील काटोलला राहतात, त्यांची तब्बेत बिघडते. वडीलांचे काही बरे-वाईट झाले तर आपल्याला संपत्तीतील काही मिळणार नाही या उद्देशाने ते पती-पत्नी काटोलला जाण्याचे ठरवतात. माया आणि उमेशला ते घराची राखण करण्यासाठी घरीच ठेवतात. कारण पावसाळ्याचे दिवस असतात. आणि जास्त पाऊस झाल्यावर पारेखवाडीतील चाळी पाण्याखाली जाण्याची शक्यता असते. निकुसेच्या खोलीशेजारी उत्तरभारतीय भैय्या लोकं राहतात. यातील सियावर चाचाला दिनकर आणि सुमित्रा मुलांकडे लक्ष देण्यास सांगतात. तेव्हा सियावर म्हणतो, ''देखो भाई, तुम तो यहाँ सोला-सतरा सालसे रहते हो। हमारे बहु-बेटे, बेटी-दामाद मुलूक में हैं। आपकी लडकी हमारी पोती जैसी। लडका पोते जैसा; और तीन-चार दिन का सवाल है। यहाँ तो चोबीस घंटा खानेसोने का पहरा चलता है।''[४७] असे सियावरचे बोलणे ऐकून दिनकर आणि सुमित्रा निश्चिंत होतात. घरात पाणी घुसले तर काय काय करायचे त्याबाबत माया आणि उमेशला सुमित्रा अनेक सूचना देते आणि कटोलला निघून जाते.

माया आणि उमेश जेवण उरकून झोपी जातात. मध्यरात्री अचानक पावसाचा जोर वाढतो आणि त्यांच्या घरात पाणी शिरते. उमेश गाढ झोपलेला असतो माया त्याला उठवत नाही. स्वतःच घरातील महत्त्वाची कागदपत्रे गोळा करून एका प्लॅस्टिकच्या ब्रिफकेसमध्ये भरून ठेवते. माळ्याच्या फळ्यांवर ती अवघडून पहुडते. तिथेच तिला डोळा लागतो. तोपर्यंत पारेखवाडीतील सगळ्या चाळी पाण्यामुळे पडतात. चाळीतील सगळे लोक माया आणि उमेशला ओरडून घराबाहेर पडण्याच्या सूचना करतात. माया आणि उमेश आपल्याला हवे तेवढी कपडे, काही वस्तू पिशवीत भरून बाहेर पडतात आणि काही क्षणातच त्यांच्या घराच्या भिंतीही कोसळतात. मायाला रडू कोसळते. सगळे चाळवाले आपल्याला होईल तिकडे निघून जातात. तेथे उरतात फक्त सियावरच्या घरातील दहा-बारा पुरूष आणि ही दोघे बहीण-भाऊ.

मायाच्या मनात येते की, आपल्या एखाद्या मैत्रीणीकडे राहण्यासाठी जावे. पण तिला कोणाचीही घरे माहिती नसतात. "विचार करकरून मायाचे डोके ठणकू लागले होते. पंधरा-सोळाव्या वयात हा असला प्रकार-प्रसंग आपल्या एकटीवरच का यावा? म्हणून ती मनातल्या मनात देवाला बोल लावत होती."[४८] माया पूर्णपणे घाबरून जाते. सियावर दोघा बहीण भावाला आपल्या मेहुण्याच्या घरी घेऊन जातो. मेहुण्याच्या घरात त्याच्या घरची मंडळी आहेत असे खोटे सांगून सियावर त्यांना एका मोठ्या जनावरांच्या गोठ्यात आणतो. मायाशिवाय त्या तबेल्यात एकही स्त्री नसते. दहा-बारा कामगार त्या तबेल्यात असतात. माया एकटीच एका कोपऱ्यात झोपते आणि उमेश भैय्या लोकांसोबत झोपायला जातो. मध्यरात्री अचानक मायावर चार-पाच जणांकडून सात-आठ वेळा बलात्कार होतो. त्याचवेळी उमेशवरही बलात्कार केला जातो. बलात्कारानंतर माया शेणाच्या ढिगाऱ्याखाली मरण पावते.

मेश्रामांनी या कथेमध्ये एका निर्दोष बहीण भावाचा कशाप्रकारे बळी जातो याचे वर्णन केले आहे. पुरूषी वासनेपुढे वयाने लहान असणारे बहीण-भाऊ हतबल होतात. शेवटी माया शेणाच्या ढिगाऱ्याखाली स्वत:चा जीव देते. कोणत्याही प्रकारचा दोष नसताना मायाला आपला जीव गमवावा लागतो. उमेशही पाशवी बलात्काराने विव्हळत बेशुद्धावस्थेत पडून राहतो.

**वखवख**

मेश्रामांच्या अनेक कथांमध्ये निर्दोष स्त्रियांवर बलात्कार झाल्याचे दिसून येते. "बहुतेकवेळा त्या फसवल्या गेलेल्या, वासनांध माणसांच्या अत्याचाराला आगतिकतेने बळी पडलेल्या दिसतात."[४९] अशाच पुरूषी अत्याचाराला बळी पडलेल्या शुभांगी नावाच्या स्त्रीची शोकांतिका प्रस्तुत कथेत वर्णिली आहे. आपल्या प्रियकरासोबत लग्नाची स्वप्न पाहणाऱ्या शुभांगीचे जीवन कशाप्रकारे उध्वस्त होते याचे चित्रण या कथेत केले आहे.

वखवख या कथेतील नायिका शुभांगी एक सुशिक्षित मुलगी आहे. ती कार्पोरेशनमध्ये क्लार्क पदावर काम करते. "आजारी वडिलांची, धाकट्या भावाची जबाबदारी ती कर्त्या पुरूषासारखी पार पाडीत होती."[५०] तिच्या आईचा मृत्यू झाल्यापासून घरची सर्व जबाबदारी तिच्यावरच पडते. शुभांगी घरातील सर्व कामं करून ऑफिसला जाते. रेल्वेतून रोज ऑफिसला जात असते. तिथेच बोरीबंदरच्या रेल्वे कार्यालयात काम करणाऱ्या दीपकशी तिची ओळख होते. या ओळखीचे रूपांतर प्रेमात होते.

शुभांगी दीपकवर जीवापाड प्रेम करत असते दीपकही तितकेच प्रेम तिच्यावर करत असतो. तो शुभांगीला सिनेमाला, नाटकाला, सहलीला घेऊन जात असतो. शुभांगीलाही त्याच्यासोबत फिरणे आवडते. दोघेही लग्न करण्याचे ठरवतात. लग्न करण्याचे ठरवल्यापासून दीपक कायम तिच्या शरीराशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करतो. पण शुभांगी त्याला बजावते. "जीव गेला तरी 'लग्नाआधी मी तुला नवरेपण गाजवू देणार नाही!"[५१] शुभांगी नेहमी आपले पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करत असते. पण दीपक शरीर सुखासाठी तिच्याशी भांडत राहतो. तिच्याशी बोलणे बंद करत असतो. शुभांगी त्याला वारंवार समजावून त्याचा रूसवा दूर करत असते.

शुभांगी दीपकला भेटण्यासाठी घरात खोटी कारणे सांगते. अशीच एकदा ती दीपकला भेटायला जाते. भेटून घरी जाताना तीला खूप उशीर होतो. त्या दिवशी मुंबईत बसचा संप असतो, रस्त्यावरील सर्व लाईट गेलेल्या असतात. सगळी मुंबई अंधारात असते. शुभांगी तास-दीड तास बस थांब्यावर थांबते. पण बस काही येत नाही. रिक्षावालेही बस बंद असल्याने मनात येईल तेवढे भाडे सांगतात. शुभांगीजवळ जास्त पैसे नसतात. शेवटी ती घराकडे रिक्षाने जाऊन घरातून पैसे घेऊन देण्याचे ठरवते. रिक्षाला ती हात करते पण एकही रिक्षावाला तिच्या घराकडे जायला तयार होत नाही.

रात्रीचे दहा वाजून जातात. शुभांगी खूप घाबरून जाते. शेवटी शुभांगीला सोडण्यासाठी एक रिक्षावाला तयार होतो. पण तो तिला म्हणतो "देखो बहन! एक

मय्यत के मेसेज के लिए हम लोग रूकेला था। एक दो जगा इतल्लाभी करना है। पाच सात मिनट वहाँ थोडी खाली होगी। चलेगा तो चलिये। नही तो -"[५२] शुभांगी तयार होते. तिला तो चांगले लोक वाटतात. रिक्षावाल्या जयाने त्याच्या मित्राला अन्वरलाही घेतलेले असते. अन्वर सुरवातीला रिक्षात पुढे बसतो. थोडे अंतर पुढे गेल्यानंतर अडचणीचे निमित्त करून पाठीमागे शुभांगी शेजारी जाऊन बसतो. जया रिक्षा एका ठिकाणी थांबवतो आणि रसूल नावाच्या मित्राला रिक्षात घेतो. काही अंतर गेल्यावर तो दोघांनाही खाली उतरतो आणि त्याच्या बहिणीला आणण्यासाठी रिक्षा पुढे नेतो. एका अंधारात जया रिक्षा थांबवतो. शुभांगीला आपली बहीण म्हातारी असल्याने तिला चालता येत नसून तिला धरून आणण्यास मदतीची मागणी करतो. शुभांगी जयासोबत एका पडक्या इमारतीत जाते. तिथे जया, अन्वर, रसूल हे तिघे दोस्त शुभांगीवर बलात्कार करतात. इतके दिवस पावित्र्य जपणारी शुभांगी अपवित्र होते.

मेश्रामांच्या कथेत अनेकवेळा स्त्रियांवर अत्याचार झाल्याचे दिसून येते. अनेक कथांमध्ये त्यांच्या नायिकांवर बलात्कार झाले आहेत. त्यातील जवळ-जवळ सर्वजणी अशिक्षित आहेत. पण 'वखवख' कथेतील शुभांगी शिक्षित असून बलात्काराचा बळी ठरते. यातून कोणतीही स्त्री आपली इज्जत जपण्याचा प्रयत्न करत असली तरी येथील पुरूषप्रधान संस्कृती तीला बेइज्जत करत असते हे स्पष्ट होते.

**समारोप :**

अशाप्रकारे 'धगाडा' या कथासंग्रहामधील कथा बलात्काराला बळी पडणाऱ्या, चोरी करणाऱ्या, अन्नासाठी जीव गमावणारे, शिक्षणासाठी पैसे कमावताना बलात्काराचा बळी ठरणाऱ्या, पाहुणचारासाठी धडपडणाऱ्या, नवऱ्याच्या विक्षिप्त वागणाच्या स्त्रीची करूण कहाणी असे आशय असणाऱ्या आहेत. तसेच 'चिखलचोथा' या कथासंग्रहातील कथा या मुंबई महानगरात राहणाऱ्या लोकांचे शोषित, पिडीत जीवन दर्शविणाऱ्या आशयाच्या आहेत.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## संदर्भ सूची


१. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ६६.

२. मेश्राम केशव : 'धगाडा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ९.

३. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १७, १८

४. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १९

५. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ७५

६. मेश्राम केशव : 'धगाडा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ३२

७. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ३४

८. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ३६, ३७

९. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ४१

१०. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ४३

११. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ७०

१२. मेश्राम केशव : 'धगाडा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ५४

१३. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ६८

१४. मेश्राम केशव : 'धगाडा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ६२

१५. मेश्राम केशव : 'धगाडा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ६८

१६. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ७६

१७. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ८१

१८. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ८७

१९. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ९४

२०. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ९५

२१. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १०४

२२. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १०४

२३. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १०५

२४. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १०६

२५. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ११०

२६. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ११२

२७. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ८

२८. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ८

२९. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८,

पृ. क्र. ६६

३०. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. १८

३१. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १८

३२. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. २०

३३. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ६८

३४. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ३४

३५. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ३७

३६. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ६७

३७. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ४९

३८. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ४९

३९. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ५२

४०. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ६९

४१. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन,

कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ६३

४२. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ७३

४३. मेश्राम केशव : पृ. क्र. ७३

४४. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ७९

४५. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ७९

४६. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ७३

४७. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. ८९

४८. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ९९

४९. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा केशव मेश्राम, संपा. डॉ. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ७०

५०. मेश्राम केशव : 'चिखल चोथा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. क्र. १०७

५१. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. १०८

५२. मेश्राम केशव : तत्रैव, पृ. क्र. ११२